नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : २४९ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




सोमवार, दि. २४ ऑगस्ट २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# युवकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासह विविध क्षेत्रांत सहभाग वाढविण्याला प्राधान्य

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : तरुणाईची अलोट गर्दी; युवकांचा मोठा उत्साह

नागपूर : (स. गांवकरी)

शिक्षण कौशल्य, क्रीडा स्टार्टअप आदी क्षेत्रात युवा पिढीचा सकारात्मक सहभाग आहे. त्यांचा हा सहभाग वाढविण्यासोबतच संपूर्ण मदत देण्यात येईल त्यासोबत स्टार्टअप इकोसिस्टीम मध्ये चर्चा करून चांगली पॉलिसी तयार करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिली. रेशीमबाग मैदानावर मुख्यमंत्र्यांच्या प्रमुख उपस्थितीत 'मंथन फॉर युवा' या उपक्रमांतर्गत ढोल ताशा पथकाचा जागतिक विक्रम तसेच विविध क्षेत्रातील आयकॉन असलेल्या व्यक्तींसोबत थेट संवाद, नशामुक्त महाराष्ट्र व देश यासाठी युवकांना शपथ आदी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी २५ हजार पेक्षा जास्त युवक व युवतींनी सहभाग नोंदवला. महाराष्ट्राची परंपरा असलेल्या ढोल ताशा पथकाने एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स, इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स आणि वर्ल्ड रेकॉर्ड्स बुक ऑफ इंडियामध्ये जागतिक विक्रम नोंदविला आहे. आधार नोंद असलेल्या ५८५ ध्वजधारकांच्या या उपक्रमामुळे जागतिक विक्रमाची नोंद झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विश्वविक्रम केल्याबद्दल



संपूर्ण चमूचे अभिनंदन केले.२५ हजारांपेक्षा जास्त युवकांच्या साक्षीने हा उपक्रम पूर्ण झाल्याचे सांगताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आजची युवा पिढी सर्वच क्षेत्रात आपल्या कौशल्याने नावलौकिक मिळवीत आहे. सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये सर्वाधिक सहभाग लाभलेल्या ध्वजधारकांच्या समावेशाबद्दल विश्वविक्रमामध्ये नोंद झाली असून यापूर्वी २६० ध्वज धारकांचा समावेश असलेला विक्रम आज मोडीत निघाला आहे. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, संविधानामुळेच लोकशाही प्रगल्भ झाली आहे. आपल्या लोकशाहीमुळेच मला नगरसेवक, महापौर, आमदार आणि मुख्यमंत्री पदापर्यंत पोहोचणे शक्य झाले आहे. संविधानामुळेच आपल्या आकांक्षा व विश्वास पूर्ण करण्यासाठी कुणीही थांबू शकत नाही असे सांगत ते आपल्या राजकीय व सामाजिक वाटचालीबाबत युवकांसमोर व्यक्त झाले. स्टार्टअप संदर्भात बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, युवकांना शासनाची संपूर्ण मदत करण्याचे धोरण असून स्टार्टअपसाठी इकोसिस्टीम पॉलिसी तयार करण्यात आली आहे.

काँग्रेस उपाध्यक्ष राहूल गांधी यांच्या 'छात्रों की गुंज' कार्यक्रमाने भाजपची झोप उडाली आहे. राहुल यांच्या पुण्यातील कार्यक्रमाला जोरदार पाठिंबा मिळाला. त्याची नक्कल करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपुरात जेन-झी बरोबर रविवारी संवाद साधला. पण, फडणवीस यांचा प्रयत्न पूर्णत: फसला. फडणवीस यांना धड नक्कसुद्धा करता येत नाही, अशी टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी रविवारी केली. राहुल गांधी हे सर्व घटकांशी संवाद साधत आहेत. 'भारत जोडो' यात्रा त्याचा भाग होती. शिक्षणाचा मुद्दा घेऊन राहूल 'छात्रों की गुंज' कार्यक्रम घेत आहेत. राहुल यांचा कार्यक्रम तरुणाईशी संवाद साधणे, त्यांचे प्रश्न जाणून घेण्यासाठी आहे. तरुण वर्गाचा राहूल यांच्या अभियानाला प्रतिसाद मिळतो आहे. राहुल यांच्याप्रमाणेच आपणही कार्यक्रम करु, असे ठरवून मुख्यमंत्री फडणवीस यांनी आज नागपूरात कार्यक्रम घेतला. पण फडणवीस यांच्या या संवादाकडे जेन- झींनी पाठ फिरवली, असा दावा सपकाळ यांनी केला.

# 'एसएनसीयू'मध्ये आग, तीन बालकांचा मृत्यू

अमरावती : (स. गांवकरी)




अमरावती येथील जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या नवीन इमारतीतील नवजात शिशू अतिदक्षता विभागात (एसएनसीयू) सोमवारी पहाटे चार वाजताच्या सुमारास भीषण आग लागली. या दुर्देवी घटनेत तीन नवजात बालकांचा मृत्यू झाला. आग लागल्यानंतर रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी धावपळ करीत इतर बालकांना सुरक्षितपणे बाहेर काढले. आगीवर लगेच नियंत्रण मिळवण्यात आले. सोमवारी पहाटेच्या सुमारास नवजात शिशू अतिदक्षता विभागातील व्हेंटिलेटरमध्ये अचानक स्फोट झाला. त्यानंतर आग लागली. ती झपाट्याने पसरली. मात्र, रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी या कक्षातील इतर बालकांना सुरक्षितपणे हलवण्यास सुरूवात केली. जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या तिसऱ्या मजल्यावर ही आग लागली. या ठिकाणी एकूण तीन नवजात शिशू अतिदक्षता कक्ष आहे. या तीन कक्षांमध्ये एकूण प्रत्येकी १३ अशी मिळून ३९ नवजात बालकांवर उपचार करण्याची क्षमता आहे. त्यापैकी एका कक्षाला आग लागली. या कक्षात एकूण १२ बालके होती. नवजात शिशू अतिदक्षता कक्षाला आग लागल्याचे लक्षात येताच सेवेवर असलेल्या परिचारिका आणि आरोग्य कर्मचाऱ्यांनी धावपळ करून बाळांना बाहेर काढले, मात्र दुर्देवाने तीन बालकांचा धुरामुळे गुदमरून मृत्यू झाला. अवघ्या वर्षभरापुर्वी नवीन इमारतीत हा नवजात शिशू अतिदक्षत विभाग सुरू करण्यात आला होता. या ठिकाणी कमी दिवसांचे, कमी वजनाचे आणि गंभीर अवस्थेतील बालकांवर उपचार करण्यात येतात. मात्र, आग लागल्यानंतर रुग्णालयातील अग्निशमन यंत्रणा का कार्यान्वित झाली नाही, असा सवाल उपस्थित केला जात आहे. या घटनेमुळे रुग्णालयातील आपात्कालीन सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. या दुर्देवी घटनेत तीन बालकांचा मृत्यू झाला असून काही बालकांना पुढील उपचारासाठी जवळच असलेल्या विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयात (सुपर स्पेशालिटी)हलवण्यात आले आहे. त्यापैकी चार बालकांवर उपचार सुरू असून एका बालकाची प्रकृती चिंताजनक असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. या बालकाच्या हाताला आणि पायाला भाजले असून अन्य तीन बालके किरकोळ भाजले आहेत. काही बालकांना डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयातही दाखल करण्यात आल्याची माहिती जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. विनोद पवार यांनी दिली.

## थोडक्यात...



### वैद्यकीय सहाय्यता कक्ष एकत्र

मुंबई (स. गांवकरी) : राज्यातील मोठ्या रुग्णालयांमध्ये उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांसह त्यांच्या नातेवाईकांना विविध सेवा-सुविधा सहज उपलब्ध व्हाव्यात, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महत्त्वाचा पुढाकार घेतला आहे. रुग्णांच्या नातेवाईकांना मदत करणाऱ्या विविध धर्मादाय संस्था आणि मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष यांच्यात सामंजस्य करार करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. या माध्यमातून गरजू रुग्ण व त्यांच्या कुटुंबीयांना एकाच ठिकाणी आवश्यक मदत मिळण्याची व्यवस्था उभारण्यात येणार आहे. राज्यातील मोठ्या रुग्णालयांमध्ये दररोज हजारो रुग्ण उपचारासाठी येतात. उपचाराचा खर्च, रुग्णालय परिसरात राहण्याची सोय, भोजन तसेच वैद्यकीय व प्रशासकीय प्रक्रियेबाबत योग्य मार्गदर्शनाचा अभाव यामुळे रुग्णांच्या नातेवाईकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो.

### जेन-झीचा संबंध जोडू नका : अवर सचिव आर. व्ही. एस. मणी

ठाणे (स. गांवकरी) : जेन-झीला शिवीगाळ करून काहीही साध्य होणार नाही. त्यांच्याशी मुलांप्रमाणे संवाद साधून त्यांची भूमिका आणि विचार समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ही मुलेच देशाचे भविष्य आहेत. जेन-झीचा सीजेपी किंवा इतर देशविरोधी संस्थांशी संबंध जोडू नका. अशा प्रकारे संवाद साधल्यास जेन-झी भरकटणार नाही आणि ते राष्ट्रहिताच्या बाजूने राहतील, असे गृह विभागाचे माजी अवर सचिव आणि 'द मिथ ऑफ हिंदू टेरर' या पुस्तकाचे लेखक आर. व्ही. एस. मणी म्हणाले. ठाण्यात झालेल्या त्र्याहत्तर हिंदू संमेलनांच्या निमित्ताने रविवारी 'राष्ट्रीय सुरक्षेपुढील आव्हाने' या विषयावर आर. व्ही. एस. मणी यांची मुलाखत घेण्यात आली. माजी खासदार, एशियाटिक सोसायटी ऑफ मुंबईचे अध्यक्ष आणि रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे उपाध्यक्ष डॉ. विनय सहस्रबुद्धे यांनी ही मुलाखत घेतली. यावेळी मणी यांच्या मूळ इंग्रजी पुस्तकाचा ज्येष्ठ पत्रकार व लेखक अरुण करमरकर यांनी केलेला मराठी अनुवाद 'हिंदू दहशतवाद नावाचे थोतांड' या पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीच्या पुनर्मुद्रणाचे प्रकाशन करण्यात आले.

### तरीही एसटी स्थानके अस्वच्छच

मुंबई (स. गांवकरी) : राज्य परिवहन (एसटी) महामंडळ प्रत्येक प्रवाशाच्या तिकिटामागे दोन रुपयांचा स्वच्छता अधिभार नियमितपणे वसूल करते. तरी राज्यातील अनेक बसस्थानके, आगारे आणि बस अस्वच्छ आहेत. दररोज सुमारे ५५ लाख प्रवाशांकडून या अधिभारातून सुमारे १.१० कोटी रुपयांहून अधिक महसूल जमा होत असतानाही अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढीग, दुर्गंधी असलेली स्वच्छतागृहे, साचलेले पाणी आणि अपुऱ्या सुविधांमुळे प्रवाशांच्या पदरी हालच आहेत. एसटी महामंडळाची राज्यभरात २५१ आगार व ५९८ बसस्थानके आहेत. प्रवाशांची वाहतूक करताना त्यांना स्वच्छ बस उपलब्ध करून देणे, त्याचबरोबर स्वच्छ बसस्थानक उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. या अनुषंगाने प्रवाशांकडून स्वच्छता अधिभार आकारण्याचा निर्णय एसटी महामंडळाने एप्रिल २०२६ रोजीपासून लागू केला. एसटी महामंडळाकडे सफाई कर्मचाऱ्यांची कमतरता असल्यामुळे स्थानिक पातळीवर कंत्राटी पद्धतीने कर्मचाऱ्यांद्वारे स्वच्छता करून घेण्यास सुरुवात केली.



# मनोज जरांगे यांच्या आंदोलनासाठी आझाद मैदानाची पाहणी

## २९ ऑगस्ट रोजी मुंबईत अवतरणार भगवं वादळ?

मुंबई : (स. गांवकरी)

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांच्या २९ ऑगस्ट रोजीच्या प्रस्तावित उपोषण आंदोलनासाठी रविवारी मराठा समाजाच्या नेत्यांनी सीएसटीएम समोरील आझाद मैदानाची पाहणी केली. मराठा समाजाला दिलेली कुणबी जात प्रमाणपत्रे पडताळणीमध्ये बाद ठरत असल्याने जरांगे यांनी आंदोलनाचे हत्यार पुन्हा उपसले आहे.

मागच्या वर्षी २९ ऑगस्ट रोजी जरांगे यांचे मुंबईत आंदोलन झाले होते. सरकारने मराठा समाजाला दिलेली आश्वासने पूर्ण केली नसल्याने जरांगे यांनी आंदोलन हाक दिली. मागच्या आठवड्यात मराठा क्रांती मोर्चाच्या नेत्यांनी मुंबई पोलीस आयुक्त आणि आझाद मैदान पोलीस स्टेशनला आंदोलनासाठी परवानगीचा अर्ज दिला. रविवारी आंदोलकांच्या नेत्यांनी आझाद मैदानाची पाहणी केली. आमचे आंदोलन शांततापूर्ण असेल, पोलिसांना आम्ही नोटीस दिली आहे, असे मराठा क्रांती मोर्चाचे प्रशांत सावंत यांनी सांगितले.

जरांगे यांना राज्यभरातून मोठे समर्थन आहे. त्यामुळे मुंबईत मोठ्या प्रमाणात आंदोलक येण्याची शक्यता असल्याने वाहतुकची समस्या उद् भवू शकते. मागच्या वर्षीच्या आंदोलनानंतर राज्य शासनाने ५७ लाख कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप केले. मात्र स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत इतर मागास वर्गासाठीच्या राखीव मतदारसंघात विजयी ठरलेल्या मराठा -कुणबी व कुणबी -मराठा उमेदवारांची प्रमाणपत्रे पडताळणीत बाद ठरु लागल्याने जरांगे शासनाच्या विरोधात आक्रमक झाले आहेत. तीन वर्षापूर्वी जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील अंतरवाली सराटी गावी जरांगे यांच्या उपोषणावर पोलीसांनी लाठीहल्ला केला होता. तेव्हापासून जरांगे प्रसिद्धीच्या झोतात आहेत. जरांगे यांच्याशी संवाद साधण्याची जबाबदारी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे- पाटील यांच्यावर आहे. जरांगे यांच्या आंदोलनाचा फटका मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना बसण्याची शक्यता आहे. कारण, बावनकुळे महसूल विभागाचे मंत्री असून त्यांच्या विभागाच्या चुकीमुळे कुणबी प्रमाणपत्रे पडताळणीत बाद ठरत आहेत, असा जरांगे यांचा आरोप आहे.






# थोडक्यात पण महत्वाचे



## आळेफाटा येथे विश्वबंधुत्व रक्तदान महाअभियान उत्साहात संपन्न

आळेफाटा (स. गांवकरी) : राजयोगिनी दादी प्रकाशमणी यांच्या १९ व्या पुण्यस्मृतिदिनानिमित्त आळेफाटा ब्रह्माकुमारीज सेंटर आणि राजयोग सेवा प्रभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विश्वबंधुत्व रक्तदान महाअभियानाचे आयोजन करण्यात आले होते. हे रक्तदान शिबिर आळेफाटा येथील ब्रह्माकुमारीज सेंटरमध्ये सकाळी ९ ते दुपारी ५ या वेळेत पार पडले. यावेळी आळेफाटा परिसरातील तरुण-तरुणी, महिला, व्यापारी व नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत ८४ नागरिकांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. याप्रसंगी ब्रह्माकुमारीज सेंटरच्या संचालिका ब्र.कु.शितल दीदी यांनी दादी प्रकाशमणी यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. त्या म्हणाल्या, "दादीजींनी संपूर्ण जीवन विश्वबंधुत्व आणि मानवसेवेसाठी समर्पित केले. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असून, यातून अनेकांचे प्राण वाचतात. हाच खरा दादीजींना आदरांजली वाहण्याचा मार्ग आहे." शिबिर यशस्वी करण्यासाठी ब्रह्माकुमारीज सेंटरच्या सेवाधारी बंधू-भगिनींनी विशेष परिश्रम घेतले. शिबिरात रक्तदान करणाऱ्या सर्व रक्तदात्यांना ब्रह्माकुमारीज सेंटरच्या वतीने प्रमाणपत्र व भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले.



## निमगाव सावा जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत बोअरवेलचे काम पूर्ण

आळेफाटा (स. गांवकरी) : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, निमगाव सावा येथे पाण्याची मोठी गरज होती. शाळेतील विद्यार्थ्यांसह शिक्षकांना दैनंदिन वापरासाठी पाण्याची अडचण निर्माण होत असल्याने शाळेसाठी बोअरवेलची आवश्यकता होती. ही गरज लक्षात घेता जिल्हा परिषद सदस्या यांच्या पुणे फंडातून मा. आमदार अतुलशेठ बेनके यांच्या मार्गदर्शनाखाली घेऊन बोरी-खोडद गटाच्या जिल्हा परिषद सदस्या सन्माननीय सौ. कल्पना वैभवकुमार काळे यांच्या माध्यमातून जि.प. प्राथमिक शाळा, निमगाव सावा येथे बोअरवेलचे काम पूर्ण करण्यात आले. या सुविधेमुळे शाळेतील विद्यार्थ्यांसह शिक्षकांना मोठा दिलासा मिळणार आहे. या कामाची व शाळेची पाहणी करण्यासाठी सौ. कल्पना वैभवकुमार काळे यांच्या समवेत पंचायत समिती सदस्य संभाजी चव्हाण, सामाजिक कार्यकर्ते श्री. रविंद्र शेगर, आदर्श सेवानिवृत्त मुख्याध्यापक श्री. चंद्रकांत जावळे, गणपत घोडे गुरूजी,चंदाताई गाडगे श्री. गणेश गाडगे (होमगार्ड), सामाजिक कार्यकर्ता श्री. किरण गोत्राळ, श्री. मच्छिंद्र घोडे, श्री. दिपक गाडगे, तसेच शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. महम्मदहनीफभाई पटेल उपस्थित होते. यावेळी शाळेतील शिक्षक श्री. बाळासाहेब राजगुरू, श्रीमती शोभा गोंदके मॅडम, श्री. दत्ता हाडवळे, श्री. प्रभाकर गुंजाळ सर, श्री. संतोष वाघोले व श्रीमती पुष्पा साके मॅडम, पत्रकार सुनिल गहिने,अजित गाडगे उपस्थित होते.बोअरवेलचे काम पूर्ण करून दिल्याबद्दल शाळेच्या वतीने मान्यवरांचे आभार श्री. बाळासाहेब राजगुरू व श्री. प्रभाकर गुंजाळ सर यांनी मानले.

## बोगस ठरावांच्या आधारे मतदार यादी; चौकशी करण्याची मागणी




सोलापूर (स. गांवकरी) : सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांमध्ये कथितरीत्या बोगस ठराव मंजूर करून गैरमार्गाने मतदार यादी तयार केली जात असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकाराची प्रशासनाने तातडीने चौकशी करून निवडणूक प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने राबवावी, अशी मागणी आमदार सुभाष देशमुख यांनी केली आहे. दक्षिण सोलापूर तालुक्यातील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांमध्ये नियमबाह्य पद्धतीने ठराव घेण्यात येत असल्याची तक्रार करण्यात आली आहे. संस्थेच्या सभासद व संचालकांना विश्वासात न घेता प्रोसिडिंग बुकवर सह्या घेण्याचा प्रकार सुरू असल्याचा आरोप आहे. तसेच संस्थेच्या अधिकृत कार्यालयाबाहेर ठराव घेण्यासह इतर अनियमितता होत असल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकारामुळे संस्थेच्या सभासदांच्या अधिकारांवर गदा येण्याची शक्यता असून, सहकार क्षेत्रातील लोकशाही मूल्यांनाही धोका निर्माण होऊ शकतो, अशी चिंता व्यक्त करण्यात आली आहे. कथित बोगस ठरावांच्या आधारे मतदार यादी तयार झाल्यास पात्र सभासद आणि संस्थांच्या संचालकांवर अन्याय होण्याची शक्यता आहे. त्यामुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीच्या निष्पक्षतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण होऊ शकते. या पार्श्वभूमीवर संबंधित प्रशासनाने तक्रारीची तातडीने दखल घेऊन संपूर्ण प्रक्रियेची चौकशी करावी, तसेच कोणत्याही प्रकारे बोगस ठरावांच्या आधारे मतदार यादी तयार होणार नाही, याची खबरदारी घ्यावी, अशी मागणी आमदार सुभाष देशमुख यांनी केली आहे.

## धर्मांतर कायद्यानुसार दाखल गुन्हा रद्द करण्याची रिपब्लिकन पार्टीची मागणी



पुणे (स. गांवकरी) : महाराष्ट्रात लागू होणाऱ्या नव्या धर्मांतरविरोधी कायद्याच्या पार्श्वभूमीवर पुणे शहरातील खडकी पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आलेला गुन्हा रद्द करावा, अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबत पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी पुणे शहर पोलीस आयुक्तांना निवेदन सादर केले. हे निवेदन पुणे शहराध्यक्ष संजय सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली सादर करण्यात आले. यावेळी पक्षाचे प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव, पुणे शहर सचिव महिपाल वाघमारे, शाम सदाफुले, ख्रिश्चन आघाडीचे पुणे शहर उपाध्यक्ष इशु दोरोस्वामी , शहर सचिव स्टॅनली मेथन यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. निवेदनानुसार, धर्मांतर विषयक नवीन कायदा २८ ऑगस्ट २०२६ पासून राज्यात लागू होणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे. मात्र, या कायद्यांतर्गत खडकी पोलीस ठाण्यात १८ ऑगस्ट २०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आल्याचा दावा पक्षाने केला आहे.

# गैरप्रकारांना गृहमंत्र्यांनी आळा घालावा



**समाजसुधारक अमोलभाऊ भागवत यांची मागणी**

सोलापूर : (स. गांवकरी)

खोटे गुन्हे दाखल करून ब्लॅकमेल करत खंडणीची मागणी करने, याला गृहमंत्र्यांनी आळा घालावा अशी मागणी समाजसुधारक अमोलभाऊ भागवत यांनी गृहमंत्री यांच्या कडे केली आहे.

समाजसेवेच्या नावाखाली होणाऱ्या गैरप्रकारांविरुद्ध जेव्हा सामान्य जनता आणि कायदेशीर व्यवस्था एकत्र येते, तेव्हा अशा प्रकारच्या घटना समोर येतात. मुखवटा विरुद्ध वास्तव: समोर आले, समाजात स्वतःला 'समाजसेविका' म्हणून मिरवणाऱ्या अशा फसव्या प्रवृत्ती प्रत्यक्षात मात्र वैयक्तिक स्वार्थ, आर्थिक फसवणूक, किंवा मानवी हक्कांचे उल्लंघन करतात. अशा व्यक्तीविरुद्ध समाजात फार रोष आहे. जेव्हा प्रशासकीय पातळीवर दिरंगाई होते, तेव्हा सामान्य जनता (पीड़ित, त्यांचे कुटुंबीय आणि सजग नागरिक) एकत्र येऊन अशा प्रवृत्तींचा निषेध करतात सर्रास ब्लॅकमेलिंग आणि धमक्या: देत, समाजसेवेचे कवच वापरून राजकीय, व्यावसायिक किंवा सामान्य लोकांना अडकवणे आणि त्यांच्याकडून खंडणी वसूल करणे असे प्रकार करणाऱ्या सारिका चंद्रकांत नागरे या संबंधित महिलेवर कडक कारवाई व्हावी म्हणून सर्व पिडितांनी एकत्र येऊन निषेध नोंदवला. यावेळी नाशिक रोड पोलीस स्टेशन येथे सदर ब्लॅकमेलर व त्यांचे गुंड सहकारी यांच्या विरुद्ध भक्कम पुरावे सादर करण्यात आले, तसेच, लवकरात लवकर कठोर कारवाई करून अटक करण्याचे आवाहन करण्यात आले, त्यानंतर समाजसेवक, पिडितांनी नाशिक जिल्हाधिकारी, पोलीस कमिशनर यांच्यासह उच्च अधिकाऱ्यांच्या देखिल सदर मुद्दयाचे गांभीर्य पटवून देण्यात आले. यापुढे सामाजिक संघटनांची, प्रत्येक संस्थेची किंवा व्यक्तीची पार्श्वभूमी तपासणे गरजेचे असे प्रतिपादन करण्यात आले, तसेच संबंधीत प्रकारावरील अर्ज राज्य गृहमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांना देखील पाठविण्यात आले व त्यांना या बाबतीत मेल करण्यात आले. जनशक्ती एकवटल्यामुळे प्रशासनावर योग्य तपास करण्याचा आणि दोषींवर कठोर कारवाई करण्याचा दबाव निर्माण झाला, अशा विकृत प्रवृत्तींमुळे प्रामाणिकपणे काम करणाऱ्या इतर चांगल्या संस्था आणि महिला कार्यकर्त्यांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन कलुषित होतो. हे वास्तव स्पष्ट करण्यात आले. याप्रसंगी जेष्ठ संपादक, शासकीय पत्रकार भगवान शहाणे, पोलखोल न्यूज संचालिका अनिता शहाणे, समाजभूषण मिनाताई सोनार, पत्रकार ज्ञानेश्वर साबळे, राजेंद्र कुलथे, रविंद्र माळवे, ॲड सुरेखा सोनार, बबन कुलथे, सुनंदा बोऱ्हाडे, सविता पवार, स्वाती मंडलिक, विशाल साळवे आणि अमोलभाऊ भागवत आदी उपस्थित होते.

## बट्याच्या वावरामुळे भीतीचे वातावरण

डांग ,गुजरात : (स. गांवकरी)



डांग जिल्ह्यातील वघई तालुक्यातील झावडा, वांझटआंबा तसेच आसपासच्या ग्रामीण भागात गेल्या काही दिवसांपासून बिबट्याचा सातत्याने वावर असल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. पावसाळ्याच्या रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत बिबट्या गावाच्या हद्दीत तसेच मानवी वस्तीच्या जवळ मुक्तपणे फिरताना दिसून येत होता. त्यामुळे संपूर्ण परिसरातील नागरिकांमध्ये घबराट पसरली होती.बिबट्याच्या वावराची माहिती ग्रामस्थांनी वनविभागाला दिल्यानंतर वनविभागाच्या पथकाने तातडीने हालचाली असलेल्या ठिकाणी पिंजरा लावला आणि बिबट्यावर लक्ष ठेवण्यास सुरुवात केली. दरम्यान, गेल्या रात्री अन्नाच्या शोधात आलेला बिबट्या पिंजऱ्यात अलगद अडकला. घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले आणि बिबट्याला ताब्यात घेतले. त्यानंतर त्याला सुरक्षित ठिकाणी हलविण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली. बिबट्या पिंजऱ्यात अडकल्याने झावडा आणि वांझटआंबा परिसरातील ग्रामस्थांनी सुटकेचा निःश्वास सोडला आहे. पावसाळ्यात जंगलालगतच्या भागात वन्यप्राण्यांचा वावर वाढत असल्याने वनविभागाने नागरिकांना रात्रीच्या वेळी अनावश्यकपणे घराबाहेर न पडण्याचे तसेच आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे.

## सोलापुरात राजकारणाच्या पलीकडचा लेझीम

सोलापूर : (स. गांवकरी)



- शिंदे गटाच्या आमदारांच्या सत्काराला उबाठाचे नेते हजर

सोलापुरातील लेझीम साऱ्या देशात प्रसिद्ध आणि त्यातच सर्वधर्मसमभावाचे प्रतीक. गणेशोत्सव, नवरात्र उत्सव तसेच धम्मचक्र प्रवर्तन दिनी सोलापुरात लेझीमचे बहारदार खेळ पाहायला मिळतात. सोलापुरातील थोरला मंगळवेढा तालीम चा लेझीम पाहण्यासाठी झुंबड उडते. या तालमीचे मार्गदर्शक शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अमोल शिंदे हे सर्वांना सोबत घेऊन गणेशोत्सव साजरी करतात. उत्सवाच्या महिना अगोदर या लेझीमची प्रॅक्टिस सुरू होते. दरम्यान विधिमंडळाची अंदाज समिती सोलापूर दौऱ्यावर आहे. या समितीचे अध्यक्ष एकनाथ शिंदे गटाचे आमदार अर्जुन खोतकर आहेत. या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर सोलापूर आलेल्या खोतकर यांच्यासह आमदार हेमंत पाटील यांच्या स्वागत आणि सत्काराचे आयोजन थोरला मंगळवेढा तालीम यांच्या वतीने करण्यात आले होते. व्यासपीठावर धाराशिवचे आमदार कैलास पाटील हे सुद्धा उपस्थित होते. या कार्यक्रमाला आमदार विजयकुमार देशमुख यांनी हजेरी लावली. विशेष म्हणजे राजकारणापलीकडचा हा लेझीम पाहायला मिळाला. उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे शहरप्रमुख प्रताप चव्हाण यांची या आमदारांच्या सत्काराला उपस्थिती होती. त्यांच्या हस्ते ही आमदारांचा सत्कार करण्यात आला.

## "समर्थ फार्मसी" च्या रुचा कोरडेचे नेत्रदीपक यश

आळेफाटा : (स. गांवकरी)



ज्ञान, अचूकता आणि वेग यांचा सुरेख संगम साधत समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, बेल्हे येथील अंतिम वर्ष बी.फार्मसीची विद्यार्थिनी कु.रुचा कोरडे हिने राष्ट्रीय स्तरावरील प्रश्नमंजुषा स्पर्धेत दैदिप्यमान यश संपादन करत विजेतेपदावर आपले नाव कोरले. स्पेक्ट्राटिक्स फार्मा प्रा. लि. आणि मायक्रोबायोलॉजिस्ट्स सोसायटी इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'राष्ट्रीय प्रश्नमंजुषा स्पर्धा २०२६' मध्ये तिने तब्बल २०० विद्यार्थ्यांमध्ये अव्वल स्थान पटकावून समर्थच्या शैक्षणिक गुणवत्तेचा झेंडा राष्ट्रीय स्तरावर फडकविला. औषधनिर्माणशास्त्र, जैवतंत्रज्ञान, सूक्ष्मजीवशास्त्र तसेच जीवनविज्ञान क्षेत्रातील अलीकडील प्रवाह या विषयांवर आधारित या राष्ट्रीय प्रश्नमंजुषेत विद्यार्थ्यांच्या विषयज्ञानासोबतच त्यांची आकलनशक्ती, तर्कशक्ती, निर्णयक्षमता आणि अद्ययावत ज्ञानाची कसोटी पाहण्यात आली. देशभरातून सहभागी झालेल्या २०० विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत झालेल्या या स्पर्धेत रुचा कोरडे हिने आपल्या भक्कम विषयज्ञानाचा आणि आत्मविश्वासाचा प्रभावी प्रत्यय दिला. विशेष म्हणजे, रुचा हिने २५ पैकी तब्बल २५ गुण मिळवत शंभर टक्के अचूकता साधली. एवढेच नव्हे, तर अवघ्या ४ मिनिटे १५ सेकंदांत प्रश्नमंजुषा पूर्ण करून तिने वेग आणि अचूकतेचा अनोखा समन्वय साधला. तिच्या या नेत्रदीपक कामगिरीने राष्ट्रीय स्तरावरील २०० स्पर्धकांमध्ये ती सर्वाधिक गुण मिळविणारी आणि अव्वल ठरली. रुचा कोरडे हिचे हे यश केवळ एका स्पर्धेतील विजय नसून सातत्यपूर्ण अभ्यास, विषयावरील सखोल प्रभुत्व, अचूक निरीक्षणशक्ती, प्रसंगावधान आणि आत्मविश्वास यांचा परिपाक असल्याचे मानले जात आहे. तिच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीच्या शैक्षणिक गुणवत्तेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. फार्मसी क्षेत्रामध्ये झपाट्याने होत असलेले तांत्रिक बदल, आधुनिक औषधनिर्मिती प्रक्रिया, जैवतंत्रज्ञानातील क्रांतिकारी प्रगती, सूक्ष्मजीवशास्त्रातील अत्याधुनिक संशोधन तसेच जीवनविज्ञानातील नव्या संकल्पना यांचे अद्ययावत ज्ञान विद्यार्थ्यांसाठी अत्यंत आवश्यक आहे. अशा राष्ट्रीय स्तरावरील ज्ञानाधारित स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांना आपल्या ज्ञानाची प्रत्यक्ष कसोटी पाहता येते, स्पर्धात्मकतेला धार मिळते आणि राष्ट्रीय व्यासपीठावर आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी मिळते. "कु.रुचा कोरडे हिने मिळविलेले हे यश समर्थ शैक्षणिक संकुलातील विद्यार्थ्यांसाठी निश्चितच प्रेरणादायी असून, ज्ञानाच्या बळावर राष्ट्रीय स्तरावरही यश संपादन करता येते, याचा आदर्श तिने निर्माण केला आहे," असा विश्वास संस्थेचे विश्वस्त वल्लभ शेळके यांनी व्यक्त केला. राष्ट्रीय पातळीवरील या अभिमानास्पद यशामुळे समर्थच्या शैक्षणिक परंपरेत ज्ञान, गुणवत्ता आणि गुणवत्तापूर्ण स्पर्धात्मकतेचा आणखी एक उज्ज्वल अध्याय जोडला गेला आहे. कु. रुचा कोरडे हिच्या या दैदिप्यमान यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊलीशेठ शेळके, सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके, माजी जिल्हा परिषद सदस्या स्नेहलताई शेळके, कॅम्पस डायरेक्टर प्रा.राजीव सावंत, समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. कुलदीप रामटेके, प्रशासकीय अधिकारी प्रा. प्रदीप गाडेकर, जनसंपर्क अधिकारी डॉ. शरद पारखे तसेच संकुलातील सर्व प्राचार्य, विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी तिचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

## करोडो रुपयांचा भ्रष्टाचार करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करा

### सोलापूरच्या नागरिकांची आमदार अभ्यास समितीचे अध्यक्ष अर्जुन खोतकर यांच्या कडे मागणी

सोलापूर : (स. गांवकरी)



सोलापूर महानगरपालिकेला लुटणाऱ्या सोलापूर महानगरपालिकेच्या सिटी इंजिनिअर सारिका आकुलवार यांना तातडीने अटक करून त्यांच्याकडून दीड कोटी रुपये वसूल करण्यात यावेत अशी मागणी सोलापूर चे नागरिकांनी आमदार अभ्यास समितीचे अध्यक्ष अर्जुन खोतकर यांना निवेदन देऊन केली आहे. संभाजी ब्रिगेड च्या वतीने सोलापूरच्या दौऱ्यावर असलेले महाराष्ट्र विधान सभा अंदाज मंडळ समिती चे अध्यक्ष अर्जुन खोतकर याना शासकीय विश्रामगृहात भेटून जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.वर्षा डोईफोडे यांच्या भ्रष्ट कारभाराबाबत व विजापूर रोडवरील छत्रपती संभाजी महाराज तलावातील करोडो रुपयांच्या भ्रष्टाचाराच्या कामाची चौकशी समिति नेमून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. समितीचे अध्यक्ष अर्जुन खोतकर यांनी संभाजी ब्रिगेडच्या निवेदनाची दखल घेऊन तात्काळ याबाबत कारवाई होईल असे आश्वासन दिले. तक्रारीमध्ये वीस मुद्दे असून जिल्हा रुग्णालयाकडील विविध टेंडर प्रक्रियामध्ये आर्थिक अनियमितता झालेली असुन पंढरपूर येथील आषाढी वारी करीता औषध , Air ambulance System , चष्मा खरेदी , तसेच कर्मचारी यांना त्रास देणे , जाहिरात बिला बाबत , कर्मचारी बेले यांना पाठीशी घालणे ,जिल्हा रुग्णालयात व कार्यालयात कर्मचारी वेळेत उपस्थित राहत नाहीत, तसेच OPD ला ही डॉक्टर नसणे स्वत: सोमवार व शुक्रवारी कार्यालयामध्ये उपस्थित राहत नसणे,जिल्हयात विविध आरोग्य संस्था मध्ये ग्रामीण रुग्णालय व उपजिल्हा रुग्णालयात स्पेशालिस्ट डॉक्टर वेळे वर उपलब्ध नसणे ग्रामीण रुग्णालय माढा येथे बाळंत मातेच्या नातेवाईकांना स्वच्छता करण्यास लावल्याने तेथील,मंगळवेढा येथे सोलापूर माननीय खासदार प्रणिती शिंदे यांनी भेट दिल्यानंतर तेथील व्यवस्था वर नाराजी झाली असुन शल्य चिकित्सक यांचेवर करावाई झाली नसणे ,तांदूळवाडी येथील दुर्घटना झालेल्या मृतदेहांची अवहेलना झालेली स्वतः पालकमंत्री जयकुमार गोरे साहेबानी नाराजगी व्यक्त झाली असून त्यांच्यावर कारवाई न होणे. पंढरपुर उपजिल्हा रुग्णालयात झालेल्या अस्वच्छता व विविध ऑपरेशन मध्ये झालेल्या गंभीर चुका याबाबत पाठीशी घालून आर्थिक निमित्त करणे,जिल्हा रुग्णालयातील MVG मधील बरेच कर्मचारी हे जिल्हा शल्यचिकित्सक तसेच इन्चार्ज सिस्टर बेले व डॉ कुलकर्णी यांच्या घरी घरगुती कामकाज करणे व कामाला लावणे ,PCPNDT चा आर्थिक टेबल हा काकडे नामक व्यक्तीकडे असून, पदभार न काढणे डॉ.श्रीकांत कुलकर्णी, हे वैद्यकिय अधिकारी प्रशिक्षण केंद्र येथे नियुक्ती असतांना त्यांना आर्थिक कामकाजामध्ये मदत घेणे अशी निवेदनात तक्रार केली आहे. त्याचबरोबर विजापूर रोडवरील छत्रपती संभाजी महाराज तलाव संवर्धन व सुशोभीकरणाच्या कामांमध्ये करोडो रुपयांच्या भ्रष्टाचार झाला असून सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त हे संबंधित अधिकाऱ्यास कर्मचाऱ्यास व ठेकेदारास पाठीशी घालत आहेत तरी याबाबत चौकशी समिती नेमून दोषीवर कारवाई करावी ही मागणी सुद्धा करण्यात आली.

## राष्ट्रीय हिंदू स्वयंसेवक संघाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षाचा वाढदिवस वृद्धाश्रमात

ठाणे, दिवा : (स. गांवकरी)



आपल्या वाढदिवसाचा दिवस सामाजिक सेवा आणि मानवतेला समर्पित करत राष्ट्रीय हिंदू स्वयंसेवक संघ महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष तथा मुंबई उच्च न्यायालयाचे अधिवक्ता बिपिन कुमार दुबे यांनी दिवा पूर्वेकडील साबे गावातील 'आपलं घर' वृद्धाश्रमात खाद्यसामग्रीचे वाटप करून ज्येष्ठांना आपल्या हाताने भोजन दिले. अधिवक्ता बिपिन कुमार दुबे आपल्या सहकाऱ्यांसह वृद्धाश्रमात पोहोचले. यावेळी त्यांनी तेथे वास्तव्यास असलेल्या ज्येष्ठ नागरिकांची आपुलकीने भेट घेऊन त्यांच्या प्रकृतीची व परिस्थितीची विचारपूस केली. तसेच ज्येष्ठांना भोजन देण्यासोबतच आवश्यक खाद्यसामग्रीचेही वाटप केले.

वाढदिवसानिमित्त आयोजित या सेवाकार्यातून वाढदिवसाचा आनंद केवळ उत्सवापुरता मर्यादित न ठेवता गरजू आणि ज्येष्ठ नागरिकांसोबत प्रेम, आपुलकी व सेवा वाटण्यातही खरा आनंद आहे असा संदेश दुबे यांनी दिला. दुबे यांच्या या सेवाभावी उपक्रमामुळे वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिक भावूक व आनंदी झाले. त्यांनी अधिवक्ता बिपिन कुमार दुबे यांना आशीर्वाद देत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासह दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. या मानवतावादी उपक्रमाचे स्थानिक स्तरावर कौतुक होत असून, वाढदिवस सामाजिक बांधिलकी जपत साजरा करण्याचा आदर्श दुबे यांनी समाजासमोर ठेवला आहे.

# हरवलेला संवाद, तुटत चाललेलं कुटुंब!

(स. गांवकरी)

**ह.भ.प. श्री. विशाल रघुनाथ गडगे, आळेफाटा**

कुटुंब म्हणजे केवळ एकाच छताखाली राहणारी माणसे नव्हेत; एकमेकांच्या मनात राहणारी माणसे म्हणजे कुटुंब. मात्र, आज घरातील माणसे एकमेकांच्या जवळ असूनही मनाने दूर जात आहेत. मोबाईलच्या पडद्यावर जगाशी संवाद वाढला; पण शेजारी बसलेल्या माणसाशी मनापासून बोलण्यासाठी वेळ कमी पडू लागला. घरात सुखसोयी वाढल्या, पण संवादाची ऊब कमी झाली. याच हरवलेल्या संवादातून नात्यांमध्ये हळूहळू दरी निर्माण होत आहे. छत्रपती संभाजीनगरमधील खवड्या डोंगरावरील अलीकडील हृदयद्रावक घटनेने या प्रश्नाला अधिक तीव्रता दिली आहे. एका मुलाच्या मनात काय वादळ सुरू होते, हे समजून घेण्याआधी आपण त्याच्या वागण्याला 'हट्ट', 'उद्धटपणा' किंवा 'मोबाईलचे व्यसन' अशी लेबले लावतो. पण तो खरोखर काय अनुभवत आहे, त्याच्या मनात कोणती घुसमट आहे, हे विचारण्यासाठी आपण त्याच्याजवळ किती वेळा बसतो? ही घटना एका कुटुंबाची शोकांतिका असली, तरी तिच्यामागचा प्रश्न प्रत्येक घरासाठी आहे. आपण आपल्या मुलांच्या मनापर्यंत पोहोचतो आहोत का?किशोरवय हे स्वतःला शोधण्याचे वय आहे. अभ्यास, करिअर, मित्रांचे आकर्षण, स्वातंत्र्याची इच्छा, पालकांच्या अपेक्षा, आर्थिक गरजा आणि सोशल मीडियावरील सततची तुलना, या सगळ्यांचा दबाव या वयात मनावर येतो. बाहेरून हसणारे मूल आतून अस्वस्थ असू शकते. म्हणून मुलाने शांत राहणे, चिडचिड करणे, एकटे राहणे किंवा निराशाजनक बोलणे याकडे केवळ हट्ट म्हणून पाहणे चुकीचे आहे. अशा वेळी उपदेशापेक्षा संवाद, रागापेक्षा संयम आणि आरोपांपेक्षा आधार आवश्यक असतो. आज पालक मुलांसाठी सर्व काही देण्याची धडपड करतात. शिक्षण, कपडे, मोबाईल, दुचाकी, खिशातील पैसे आणि इतर सुविधा देताना एक गोष्ट मात्र नकळत कमी होते ती

> सोशल मीडियाने संवादाची साधने वाढवली; पण संवेदनशीलता वाढलीच असे नाही. संकटात सापडलेल्या व्यक्तीला मदत करण्याऐवजी त्याचा 'लाइव्ह' करणारी गर्दी दिसते, तेव्हा प्रश्न तंत्रज्ञानाचा नसून माणुसकीचा होतो. एखाद्याच्या आयुष्यातील सर्वांत वेदनादायक क्षण हा आपल्या मोबाईलच्या कॅमेऱ्यासाठीचा 'कंटेंट' होऊ शकत नाही. संकटाच्या वेळी कॅमेरा नव्हे, मदतीचा हात पुढे झाला पाहिजे.

वेळ! मुलाला महागडा मोबाईल देण्यापेक्षा त्याच्यासोबत काही क्षण मनापासून बोलणे अधिक महत्त्वाचे आहे. प्रत्येक मागणी पूर्ण करणे म्हणजे पालकत्व नाही; पण मागणी का आहे, तिच्यामागची भावना काय आहे, हे समजून घेणे नक्कीच पालकत्व आहे. घरातील मतभेदही मुलांच्या मनावर खोल परिणाम करतात. पालक आणि मुलांमध्ये विचारांचा फरक असणारच; पण मतभेद संवादाने सोडवता येतात. "माझे कोणी ऐकत नाही", "मला कोणी समजून घेत नाही", "मी एकटाच आहे", अशी भावना मनात रुजली की मूल माणसांच्या गर्दीतही एकटे पडू शकते. शिस्त आवश्यक आहे; पण शिस्तीला विश्वासाची जोड नसेल, तर ती दुरावा निर्माण करते. भीती मुलाला गप्प करू शकते; पण विश्वासच त्याला मन मोकळे करायला शिकवतो. कुटुंबातील संवाद केवळ पालक-मुलांपुरता मर्यादित नाही. पती-पत्नीमध्ये संवाद कमी झाला, तर गैरसमज वाढतात; भावंडांमध्ये संवाद तुटला, तर आपलेपणा कमी होतो; वृद्ध आई-वडिलांशी संवाद हरवला, तर घरातील अनुभवाची शिदोरीच हरवते. नाती मोठ्या संकटांनीच तुटतात असे नाही; अनेकदा एक न बोललेला राग, एक न ऐकलेली खंत आणि एक न समजलेली भावना हळूहळू मनांमध्ये भिंती उभ्या करतात. प्रत्येक घराने दररोज काही क्षण मोबाईल बाजूला ठेवून माणसांसाठी राखून ठेवले पाहिजेत. मुलाला फक्त "अभ्यास कसा झाला?" असे न विचारता, "आज तुझ्या मनात काय आहे?" असे विचारले पाहिजे. सल्ला देण्यापूर्वी ऐकले पाहिजे.

# ओतूर ग्रामस्थांचे उपोषण तिसऱ्या दिवशीही सुरू

## लेखी आश्वासनासाठी ग्रामस्थ ठाम, प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

कळवण : (स. गांवकरी)




कळवण तालुक्यातील ओतूर ग्रामपंचायतीच्या गावठाण हद्दीतील कथित अनधिकृत बांधकाम व अतिक्रमणाच्या प्रश्नावरून ग्रामस्थांनी आंदोलनाचे हत्यार उपसले असून, प्रशासकीय इमारत, कोल्हापूर फाटा येथे गेल्यातीन दिवसांपासून उपोषण सुरू आहे.वारंवार तक्रारी करूनही अपेक्षित कारवाई होत नसल्याचा आरोप उपोषणकर्त्या ग्रामस्थांनी केला आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी उपोषणकर्त्यांची भेट घेऊन त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला;मात्र लेखी व ठोस आश्वासन मिळेपर्यंत उपोषण मागे घेणार नसल्याची भूमिका ग्रामस्थांनी घेतली आहे. उपोषणकर्त्यांच्या म्हणण्यानुसार,ओतूर गावातील संजय बाबुलाल घरटे यांच्या कथित अनधिकृत बांधकाम व अतिक्रमणाचा प्रश्न तातडीने निकाली काढावा,सार्वजनिक वापर कायमस्वरूपी मोकळा करावा,तसेच शासकीय पदाचा गैरवापर करून सर्वसामान्य नागरिकांना त्रास दिल्याचाआरोप संबंधित व्यक्तीविरुद्ध, पोलीस कर्मचारी असल्याचा दावा करत, योग्य ती चौकशी व कायदेशीर कारवाई करावी,अशा मागण्या करण्यात आल्या आहेत.ग्रामपंचायतीकडून पाहणी व नोटीस; तरीही प्रश्न कायम या प्रकरणाची दखल घेतओतूरग्रामपंचायतीचे सरपंच उपसरपंच,ग्रामसेवक व ग्रामपंचायत सदस्यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केल्याचे उपोषणकर्तेनी ग्रामस्थांनी सांगितले आहे. संबंधित अतिक्रमणधारकांना ग्रामपंचायतीकडून लेखी नोटीस बजावण्यात आल्याचे त्यांचे म्हणणे आहे. तसेच संबंधित बांधकामाबाबत कारवाईचा इशाराही देण्यात आल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

मात्र,नोटीस बजावून व पाहणी करूनही अद्याप प्रत्यक्ष आणि ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप उपोषणकर्त्यांनी केला आहे.त्यामुळे प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन कायदेशीर प्रक्रियेनुसार पुढील कार्यवाही करावी,अशी मागणी होत आहे उपोषणकर्त्यांच्या आरोपानुसार,एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीच्या शौचालयाच्या टाकीवरच घराचे बांधकाम करण्यात येत आहे. संबंधित बांधकामामुळे भविष्यात शौचालयाच्या टाकीची दुरुस्ती अथवा अन्य तांत्रिक काम करण्याची वेळ आल्यास त्या ठिकाणी काम कसे करता येईल, असा प्रश्न ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे. सार्वजनिक वापराचा रस्ता तसेच इतरांच्या वापराच्या जागेवर अतिक्रमण झाल्यास भविष्यात नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागू शकतो, अशी भीतीही उपोषणकर्त्यांनी व्यक्त केली आहे. या आरोपांची प्रशासनाने प्रत्यक्ष पाहणी करून वस्तुस्थिती तपासावी, अशी मागणीही ग्रामस्थांकडून होत आहे.

संबंधित व्यक्तीशी संपर्काचा प्रयत्न; मात्र संपर्क होऊ शकला नाही दरम्यान, तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार माध्यमांनी कथित अनधिकृत बांधकाम व अतिक्रमणाबाबत संजय बाबुलाल घरटे यांची बाजू जाणून घेण्यासाठी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांचा संपर्क क्रमांक उपलब्ध होऊ न शकल्याने संपर्क होऊ शकला नाही. मिळालेल्या माहितीनुसार संबंधित व्यक्ती मुंबई येथे राहत असल्याचे सांगण्यात आले.त्यामुळे त्यांची प्रत्यक्ष भेट होऊ न शकल्याने या प्रकरणातील त्यांची बाजू जाणून घेता आली नाही . संबंधित व्यक्तीची बाजू उपलब्ध झाल्यास तीही प्रसिद्ध करण्यात येईल हे स्पष्ट राहणे आवश्यक आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट;मात्र लेखी आश्वासन नाही गेल्या तीन दिवसांपासून उपोषण सुरू असताना वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन उपोषणकर्त्यांशी चर्चा केली.आंदोलन मागे घेण्यासाठी समजूत काढण्याचा प्रयत्नही करण्यात आला.मात्र केवळ तोंडी आश्वासनावर विश्वास ठेवण्यास ग्रामस्थ तयार नसून, लेखी आश्वासन आणि त्यानुसार प्रत्यक्ष कार्यवाहीची हमी मिळाल्याशिवाय उपोषण मागे घेणार नसल्याची ठाम भूमिका त्यांनी घेतली आहे.गेल्या तीन दिवसांपासून नागरिक उपोषणाला बसले असताना अद्याप या प्रश्नावर ठोस तोडगा निघालेला नसल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.ग्रामस्थांची तक्रारींची दखल घेण्यासाठी आणखी किती दिवस प्रतीक्षा करावी लागणार? असा सवाल उपोषणकर्त्यांकडून उपस्थित केला जात आहे.या प्रकरणात आरोप-प्रत्यारोपांपेक्षा प्रत्यक्ष वस्तुस्थिती काय आहे,हे प्रशासनाने निष्पक्षपणे तपासणे महत्त्वाचे आहे. संबंधित बांधकामाची कायदेशीरता, अतिक्रमणाची वस्तुस्थिती, सार्वजनिक रस्त्याची स्थिती आणि शौचालयाच्या टाकीबाबत करण्यात आलेल्या आरोपांची प्रत्यक्ष पाहणी करून नियमांनुसार निर्णय घेण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

> केवळ तोंडी आश्वासन न देता प्रशासनाने चौकशीचा स्पष्ट निष्कर्ष,आवश्यक कारवाई आणि पुढील कार्यवाहीबाबत लेखी आश्वासन द्यावे,अशी उपोषणकर्त्यांची मागणी आहे.त्यामुळे आता प्रशासन या संवेदनशील प्रकरणात काय निर्णय घेते आणि ग्रामस्थांचे उपोषण कधी मागे घेतले जाते, यां कडे लक्ष कळवण : ओतूर ग्रामस्थांच्या अतिक्रमण व अनधिकृत बांधकामाच्या प्रश्नावर सुरू असलेले उपोषण अखेर गटविकास अधिकारी रमेश वाघ यांच्या लेखी आश्वासनानंतर मागे घेण्यात आले.विस्तार अधिकारी सोनवणे यांच्या हस्ते उपोषणकर्त्यांनी उपोषण सोडले.

## थोडक्यात पण महत्वाचे



### ठाण्यात अजित पवार गटाला गळती अनेक पदाधिकाऱ्यांचा पक्षात प्रवेश

ठाणे (स. गांवकरी) : ठाण्यातील राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाला गळती लागली आहे. आज अजित पवार गटातील ओवळा - माजीवडा विधानसभा क्षेत्राचे युवक कार्याध्यक्ष फिरोज शेख आणि ब्लॉक अध्यक्ष गोशफाक शेख यांनी राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस डॉ.जितेंद्र आव्हाड आणि जिल्हाध्यक्ष मनोज प्रधान, कार्याध्यक्ष प्रकाश पाटील यांच्या उपस्थितीत पक्ष प्रवेश केला. गेल्या काही दिवसांपासून राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षात इनकमिंग मोठ्याप्रमाणात वाढू लागले आहे. राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांच्या विचारधारेला अनुसरून आणि राष्ट्रीय सरचिटणीस डॉ.जितेंद्र आव्हाड यांचे नेतृत्व स्वीकारून मोठ्याप्रमाणात युवक पक्ष प्रवेश करू लागले आहेत. आज युवक अध्यक्ष अभिजीत पवार , युवा नेते वीरू वाघमारे यांच्या पुढाकाराने अजित पवार गटातील ओवळा - माजीवडा विधानसभा क्षेत्राचे युवक कार्याध्यक्ष फिरोज शेख आणि ब्लॉक अध्यक्ष गोशफाक शेख यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी पक्षात प्रवेश केला. डॉ.जितेंद्र आव्हाड आणि मनोज प्रधान यांनी सर्वांचे पक्षात स्वागत केले. यावेळी माथाडी सेलचे अध्यक्ष सचिन पंधरे, महिला कार्याध्यक्ष फुलबानो पटेल, ओबीसी सेलच्या महिलाध्यक्ष मनिषा पाटील, बिपीन गेहलोत आदी उपस्थित होते.




### शिक्षकांनी शिक्षकांसाठी सुरु केले कुसुमाग्रज वाचनालय

पाथर्डी (स. गांवकरी) : स्वातंत्र्य दिनाच्या मंगल मुहूर्तावर माणिकदौंडी केंद्रातील जी.प. प्राथमिक शाळेच्या शिक्षकांनी शिक्षकांसाठी स्वखर्चातून कुसुमाग्रज वाचनालय सुरु करून चांगला पायंडा पाडला आहे. या कृतीचे तालुक्यातील शिक्षकांनी अनुकरण करून आदर्श निर्माण करावा असे आवाहन पंचायत समितीचे माजी सदस्य विष्णुपंत पवार यांनी केले. जी.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, शिक्षणाधिकारी राख, गटशिक्षणाधिकारी शिवाजी कराड यांच्या मार्गदर्शना खाली,केंद्र माणिकदौंडी अंतर्गत येणाऱ्या सर्व शिक्षकांनी एकत्र येत एक अत्यंत प्रेरणादायी पाऊल उचलले आहे. शिक्षकांमध्ये वाचन संस्कृतीचे जतन आणि संवर्धन व्हावे, या उदात्त हेतूने स्वतःच्या वर्गणीतून खास शिक्षकांसाठी 'कुसुमाग्रज वाचनालय' सुरू केले आहे. वाचनालयाचे उद्घाटन पंचायत समिती माजी सदस्य विष्णुपंत पवार यांचे हस्ते तर गटशिक्षण अधिकारी शिवाजी कराड यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या वेळी समूह साधन केंद्र समन्वयक विठ्ठल शिंदे, नागनाथ हलकम्बे यांच्यासह माणिकदौंडी केंद्रातील सर्व शिक्षक बंधू-भगिनी उपस्थित होते. ज्ञानाची देवाणघेवाण वाढवणाऱ्या शिक्षकांच्या या नावीन्यपूर्ण उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

### विविध उपाय योजनाचा आढावा बाल हक्क संरक्षण आयोगाने घेतला



सोलापूर (स. गांवकरी) : राज्यातील आश्रमशाळा, निवासी शाळा व वसतिगृहांमध्ये बालकांना सुरक्षित, निरोगी व बालस्नेही वातावरण उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने विविध उपाययोजनांचा आढावा महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या वतीने घेण्यात आला. बालकांच्या सुरक्षिततेसह आरोग्य, शिक्षण, निवास, स्वच्छता, अन्न-पाणी, बालहक्कांचे संरक्षण आणि संबंधित यंत्रणांमधील समन्वय याबाबत बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. आयोगाच्या कार्यालयात आयोजित बैठकीस महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे अध्यक्ष ॲड. संजय पुराणिक, सदस्य गीतांजली बुटी, शुभांगी तांबट, संजय लाखेपाटील, अतुल देसाई, प्रविण भुजाडे, मिलन जंगम तसेच आयोगाच्या सचिव वंदना जैन यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी व प्रतिनिधी उपस्थित होते. निवासी संस्थांमध्ये बालकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने अधिकारी, अधीक्षक, शिक्षक व इतर कर्मचाऱ्यांनी 24 तास संवेदनशील व जबाबदारीने कार्य करणे आवश्यक असल्याचे बैठकीत नमूद करण्यात आले. वरिष्ठ स्तरावरून देण्यात येणाऱ्या सूचनांची तळागाळातील यंत्रणेकडून प्रभावी अंमलबजावणी होत आहे किंवा नाही, याचे नियमित परीक्षण करण्याची आवश्यकता यावेळी अधोरेखित करण्यात आली. आश्रमशाळा व निवासी संस्थांमध्ये उपलब्ध असलेल्या सुविधांचा बालकांना प्रत्यक्ष मिळत असलेल्या लाभाबाबत तपासणी करण्यासाठी चाईल्ड सेफ्टी ऑडिट व प्रभावी देखरेख पद्धत विकसित करण्याबाबत बैठकीत चर्चा झाली. यामध्ये पिण्याचे पाणी, अन्नाची गुणवत्ता, आरोग्य, स्वच्छता, CCTV व्यवस्था, कर्मचाऱ्यांची पडताळणी, तक्रार निवारण व्यवस्था आणि विद्यार्थ्यांचा अभिप्राय या बाबींचा समावेश करण्याची सूचना करण्यात आली. राज्यातील आश्रमशाळा, निवासी शाळा व वसतिगृहांमध्ये बालकांना सुरक्षित, निरोगी व बालस्नेही वातावरण उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने विविध उपाययोजनांचा आढावा महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या वतीने घेण्यात आला. बालकांच्या सुरक्षिततेसह आरोग्य, शिक्षण, निवास, स्वच्छता, अन्न-पाणी, बालहक्कांचे संरक्षण आणि संबंधित यंत्रणांमधील समन्वय याबाबत बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.

### हार्वर्डमध्ये मानस गुरुप्रसाद रामकथेचा आठवा दिवस संपन्न



बोस्टन (स. गांवकरी) : अमेरिकेतील हार्वर्ड विद्यापीठाच्या सँडर्स थिएटर मेमोरियल हॉलमध्ये आयोजित 'मानस गुरुप्रसाद' रामकथेच्या आठव्या दिवशी भक्ती, गुरु-परंपरा, ज्ञान आणि साधेपणाचा संदेश देण्यात आला. याच कार्यक्रमात यावर्षीचा तुळशी जन्मोत्सवही भक्तिभावाने साजरा करण्यात आला. कथेच्या आठव्या दिवशी सकाळच्या सत्रातील शेवटच्या भाषणात महंत श्री पूज्य राम हृदयदास जी महाराज, चित्रकूट कामदगिरी परिक्रमा परिसर, यांनी बापूंच्या कार्याचे कौतुक करताना सांगितले की, "बापूंसारखा पुत्र लाभल्याने भारतमातेला अभिमान वाटेल." त्यांनी बापूंच्या दरबारातील प्रेम, माया आणि स्नेहाचा उल्लेख करत प्रत्येकासाठी त्यांच्या दरबाराचे दरवाजे खुले असल्याचे सांगितले.

## एचडीएफसी बँकेचा 1.75 अब्ज डॉलरचा परदेशी बाँड इश्यू

नवी दिल्ली : (स. गांवकरी)

एचडीएफसी बँकेने आपल्या व्यवसायाच्या वाढीसाठी परदेशी बाँडच्या माध्यमातून 1.75 अब्ज डॉलर उभारले आहेत. एचडीएफसी बँकेच्या GIFT सिटी शाखेमार्फत 1.75 अब्ज डॉलरचे वरिष्ठ असुरक्षित बाँड (सीनियर अनसिक्युअर्ड बॉन्ड) जारी करण्यात आले आहेत, अशी माहिती बँकेने नियामकांना दिलेल्या अहवालात सांगितली. जागतिक आर्थिक संकटानंतर एखाद्या भारतीय बँकेने उभारलेला हा सर्वात मोठा निधी आहे. या बाँड इश्यूला आशिया, अमेरिका आणि युरोपमधील गुंतवणूकदारांकडून मोठा प्रतिसाद मिळाला. खासगी क्षेत्रातील या बँकेने 50 कोटी डॉलरचे बाँड 5.16 टक्के व्याजदराने (कूपन रेट) जारी केले असून, त्याची मुदत 3 वर्षांची आहे. उर्वरित 1.25 अब्ज डॉलरचे पाच वर्षांच्या मुदतीचे बाँड असून, त्यावर 5.4 टक्के व्याजदर (कूपन रेट) देण्यात येणार आहे. हे बाँड इंडिया आयएनएक्स (इंडिया इंटरनॅशनल एक्सचेंज (आयएफएससी) लिमिटेड) आणि एनएसई इंटरनॅशनल एक्सचेंज (एनएसई-आयएक्स) येथे सूचीबद्ध केले जाणार आहेत.

## युवकांनी स्वतःच्या पायावर भक्कमपणे उभे रहावे - एन. बी. धुमाळ

पाथर्डी : (स. गांवकरी)



पाथर्डी तालुक्याचे भाग्यविधाते, श्री.वृद्धेश्वर सहकारी साखर कारखाना लि. व श्री दादापाटील राजळे शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सहकारमहर्षी स्व.दादापाटील राजळे यांच्या १०४ व्या जयंतीनिमित्त स्मृती व्याख्यानमालेच्या दुसऱ्या व्याख्यान प्रसंगी उद्योजक, लेखक व वक्ते श्री एन. बी. धुमाळ यांनी 'युवकांनो उद्योजक बना' या विषयावर आपले विचार व्यक्त केले. आपल्या व्याख्यानात त्यांनी पुढे असे सांगितले की, मुलांनी शिक्षण घेऊन नोकरी शोधण्यापेक्षा उद्योजक व्हावे. छोट्या मोठ्या व्यवसायातूनच उंच झेप घेता येते. पोटाची भूक भागवण्यासाठी एक वेळ जेवणाची आवश्यकता असते तर आयुष्यभराची भूक भागवण्याची ताकद पुस्तकांत आहे. ज्ञान हे यशाचा मूलमंत्र आहे. आपल्या ओघवत्या वाणीत त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.याप्रसंगी त्यांनी स्वलिखित 'यशाचे १११ मंत्र' या पुस्तकाच्या प्रती महाविद्यालयाचे ग्रंथालयास भेट दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. जे. एन. नेहुल यांनी केले तर आभार डॉ. मेहबूब तांबोळी यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.राजेंद्र इंगळे व डॉ. किशोरकुमार गायकवाड यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ संचालक श्री उद्धवराव वाघ यांनी स्व. दादापाटील राजळे (भाऊ) यांच्या स्मृतीस उजळा दिला.याप्रसंगी महाविद्यालयातून निवृत्त झालेले डॉ.सुभाष भगवान देशमुख, डॉ. सुभाष जगन्नाथ देशमुख, डॉ.जालिंदर कानडे, प्रा. गोरक्ष अकोलकर, श्री विष्णू साप्ते यांचा सपत्नीक सत्कार महाविद्यालयातर्फे करण्यात आला. राहुलदादा राजळे यांनी महाविद्यालयाच्या विकासाचा आढावा घेतला व सर्वांचे कौतुक केले. कार्यक्रमासाठी प्रा. दशरथ खोसे, डॉ. यशवंतराव गवळी, रामकिसन काकडे, बाबासाहेब किलबिले, बापूसाहेब पाटेकर, पोपटराव आंधळे, आर. वाय. मस्के, दत्तात्रय भगत, सुनील ओव्हाळ, संदीप लोखंडे, नानासाहेब देशमुख, सुनील पुंड, शहाने सर, प्राचार्य राजधर टेमकर, प्राचार्य शांताराम खणगे, प्राचार्य सुनील पानखडे, प्राचार्य अशोक काळे, मुख्याध्यापक अशोक ताठे, संस्थेतील सर्व शिक्षक- शिक्षकेतर वृंद, परिसरातील नागरिक- पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कुंभमेळाच्या पार्श्वभूमीवर आरोग्य यंत्रणेने गतिमान पद्धतीने कामकाज करावे

### सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या उपस्थितीत आढावा बैठक



नाशिक : (स. गांवकरी)

नाशिक त्र्यंबकेश्वर येथे पुढील वर्षी सिंहस्थ कुंभमेळा होत आहे. यानिमित्त देश- विदेशातून मोठ्या संख्येने भाविक येतील. यात सार्वजनिक आरोग्य विभागाची भूमिका महत्वाची असून कुंभमेळा आरोग्य विभागाला बळकटीकरणासाठी उपयुक्त ठरणार आहे. त्यामुळे भाविकांना आरोग्य सेवा पुरविण्यासाठी आरोग्य यंत्रणेने डिसेंबरपर्यंत व्यवस्था सज्ज करण्यासाठी गतिमान पद्धतीने कामकाज करावे, असे निर्देश राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले. नाशिक त्र्यंबकेश्वर येथे पुढील वर्षी होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक आरोग्य विभागाशी संबंधित कुंभमेळा पूर्वतयारीबाबतची आढावा बैठक आज दुपारी कुंभमेळा प्राधिकरणाच्या कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी खासदार राजाभाऊ वाजे, आमदार देवयानी फरांदे, आमदार सरोज अहिरे, आमदार हिरामण खोसकर, उपमहापौर विलास शिंदे, त्र्यंबकेश्वरच्या नगराध्यक्ष त्रिवेणी तुंगार, कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार, आरोग्य उपसंचालक डॉ. कपिल आहेर, प्राधिकरणाचे अतिरिक्त आयुक्त कमलाकर रणदिवे, जिल्हा परिषदेचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर मोरे, वैद्यकीय अधिकारी डॉ. अनंत पवार आदी उपस्थित होते. मंत्री श्री. आबिटकर म्हणाले की, कुंभमेळ्यात येणाऱ्या भाविकांसाठी प्राधिकरणाच्या माध्यमातून आरोग्य विभागाने नियोजन केले आहे. भाविकांची संभाव्य संख्या लक्षात घेऊन आवश्यक यंत्रसामग्री, औषध साठ्याचे आतापासूनच नियोजन करावे. भाविकांची कोणतीही गैरसोय होणार नाही, अशी दक्षता घ्यावी. काही शासकीय रुग्णालयांची प्रलंबित कामे मोहीम स्तरावर पूर्ण करीत येत्या डिसेंबरपर्यंत ही सर्व रुग्णालये कार्यान्वित करून त्यांचे लोकार्पण करावे. जिल्ह्यात रुग्णवाहिकांची संख्या वाढविण्यात येईल. कुंभमेळा कालावधीत मनुष्यबळ उपलब्धतेसाठी आवश्यक ते सहकार्य करण्यात येईल. वैद्यकीय क्षेत्रातील संस्था, संघटनांचे सहकार्य घ्यावे. त्यासाठी समन्व्य साधावा, असेही त्यांनी सांगितले. कुंभमेळ्यात येणाऱ्या भाविकांनी 'फ्ल्यू' प्रतिबंधक लसीकरण करून यावे यासाठी जनजागृती करण्यात येईल. याबरोबरच नागरिकांच्या आरोग्याची सर्वतोपरी काळजी घेतली जाईल, असेही नियोजन करावे. नवीन, अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करून जळीत रुग्णांसाठी कक्ष कार्यान्वित करावा. त्यासाठी औषधोपचाराची पद्धती निश्चित करावी, अशीही सूचना मंत्री श्री. आबिटकर यांनी केली. त्र्यंबकेश्वर आणि परिसरातील रुग्णांची गैरसोय होणार नाही याचीही दक्षता घ्यावी. आवश्यकतेनुसार सद्य:स्थितीतील इमारतीत बाह्य रुग्ण विभाग कार्यरत ठेवावा. तसेच नवीन रुग्णालयासाठी पर्यायी जागेचा शोध घ्यावा.

## सापुताऱ्यात बोटिंग चालकांचा निष्काळजीपणा?

डांग : गुजरात : (स. गांवकरी)



गुजरातमधील एकमेव गिरिमथक असलेल्या सापुताऱ्यातील प्रसिद्ध सर्पगंगा तलावातील बोटिंगची व्यवस्था पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. बोटिंग चालकांकडून लाइफ जॅकेटची स्वच्छता करताना कथितरित्या रसायनमिश्रित पाणी थेट तलावात सोडण्यात आल्याचा गंभीर आरोप करण्यात येत आहे. या प्रकारानंतरही संबंधित यंत्रणा मौन बाळगत असल्याने स्थानिक नागरिक आणि पर्यटकांमध्ये चर्चा सुरू झाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, काल एक सनदी अधिकारी आपल्या कुटुंबासह सापुतारा येथे बोटिंग करण्यासाठी आले होते. सर्पगंगा तलावावर बोटिंगसाठी देण्यात आलेल्या लाइफ जॅकेटमधून दुर्गंधी येत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. यामुळे अधिकाऱ्यांनी घटनास्थळीच बोटिंग चालकांची चांगलीच कानउघाडणी केल्याचे सांगण्यात येत आहे. या घटनेनंतर आपली चूक लपवण्यासाठी बोटिंग चालकांनी धुक्याच्या वातावरणाचा फायदा घेत बोटीमध्येच लाइफ जॅकेट धुण्याचे काम सुरू केल्याचा आरोप आहे. यासाठी रसायन आणि पाण्याचा वापर करण्यात आला असून, जॅकेट धुतल्यानंतर तयार झालेले घाणेरडे व रसायनमिश्रित पाणी कथितरित्या थेट सर्पगंगा तलावात सोडण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. जर हे आरोप खरे ठरले, तर हा प्रकार केवळ बोटिंग व्यवस्थेपुरता मर्यादित राहत नाही, तर तलावाच्या पर्यावरणावर आणि पाण्याच्या गुणवत्तेवरही गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे.

## निळवंडेच्या जिल्हा परिषद शाळेत राखी बनवण्याची कार्यशाळा उत्साहात संपन्न

### चिमुकल्यांच्या हातांनी साकारलेल्या आकर्षक राख्या सीमेवरील जवानांना पाठवणार

संगमनेर : (स. गांवकरी)



सण उत्सवांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, कलाकौशल्य, बंधुभाव आणि देशप्रेमाची भावना रुजावी, या उद्देशाने अहिल्यानगर जिल्हा परिषद आयोजित आनंददायी शनिवार उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा निळवंडे येथे राखी बनवण्याची अभिनव कार्यशाळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

संग्राम मूकबधिर विद्यालयाचे माजी कलाशिक्षक देविदास गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा घेण्यात आली. विद्यार्थ्यांसाठी विविध रंगांचे धागे, मणी, मोती, सजावटीचे साहित्य आदी साहित्य मुख्याध्यापक रमेश निघुते यांनी उपलब्ध करून दिले. या साहित्याचा कल्पकतेने वापर करत विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हातांनी सुंदर, रंगीबेरंगी आणि आकर्षक राख्या तयार केल्या. त्यामुळे शाळेचा परिसर सर्जनशीलतेने आणि उत्साहाने फुलून गेला. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या राख्या केवळ कलाकृती म्हणून न ठेवता त्या देशाच्या सीमेवर कर्तव्य बजावणाऱ्या जवानांपर्यंत पोहोचविण्याची संकल्पना शाळेतील उपक्रमशील शिक्षक अनिल कडलग यांनी मांडली. त्याला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. निळवंडे गावातील सैन्यातून निवृत्त झालेले मेजर बाबासाहेब पवार, सुभेदार प्रकाश पवार, सुभेदार बाबासाहेब पवार, मेजर सोमनाथ केरे, मेजर मच्छिंद्र पवार यांच्याकडे विद्यार्थ्यांनी प्रेमपूर्वक या राख्या सुपूर्द केल्या. छत्तीसगड मधील रायपूर या ठिकाणी असलेल्या सीमा सुरक्षा बल 58 बटालियन सीमेवरील जवानांना या राख्या पाठविण्यात येणार आहेत. निळवंडे गावातील मेजर सोमनाथ केरे त्या ठिकाणी कार्यरत आहेत. ते स्वतः या राख्या तेथील जवानांना घेऊन जात आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या या छोट्याशा कृतीतून जवानांप्रती कृतज्ञता, आदर आणि देशप्रेमाची भावना व्यक्त झाली. बहिणीच्या प्रेमाची राखी आणि जवानांप्रती कृतज्ञतेची भावना असा सुंदर संदेश देणाऱ्या या उपक्रमाचे उपस्थितांनी विशेष कौतुक केले. विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला वाव देतानाच सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रप्रेमाची जाणीव करून देणारे उपक्रम शालेय जीवनात अत्यंत महत्त्वाचे असल्याचे यावेळी मान्यवरांनी सांगितले.

शाळेचे मुख्याध्यापक रमेश निघुते यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रमशील शिक्षक अनिल कडलग यांनी या कार्यशाळेचे आयोजन केले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस संजय एरंडे यांनी कलाशिक्षक देविदास गोरे यांचा परिचय करून दिला. ज्येष्ठ शिक्षक कैलास दिघे यांनी प्रास्ताविकातून उपक्रमाची भूमिका स्पष्ट केली. तुषार फल्ले यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. अनिल गाडेकर यांनी आभार मानले. कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी शाळेतील शिक्षिका सौदामिनी सोनवणे, मंदा कडलग - गायकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

> विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देतानाच आपल्या देशाचे रक्षण करणाऱ्या जवानांच्या हातावर प्रेमाची राखी बांधण्याची संधी देणारा हा उपक्रम निळवंडे शाळेच्या उपक्रमशीलतेचा आणि सामाजिक बांधिलकीचा आदर्श ठरणार आहे. आम्ही विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने व प्रेमपूर्वक बनवलेल्या राख्या रक्षाबंधनाच्या दिवशी सीमेवरील जवान हातात बांधतील याचा मनस्वी खूप आनंद वाटतो.
> **- साईश्वरी सोमनाथ आहेर व सार्थक रावसाहेब वारे इयत्ता पाचवी**

# नगरसेवक रमेश थोरात यांची मास्टरस्ट्रोक खेळी, थेट आरोग्यमंत्री आबिटकरांनाच घातले साकडे

## सुरगाण्याच्या आरोग्य यंत्रणेचा कायापालट होणार? मंत्र्यांचे थोरातांना आश्वासन

कनाशी : (स. गांवकरी)



आदिवासीबहुल आणि अतिदुर्गम म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सुरगाणा तालुक्याच्या आरोग्य प्रश्नावर आता थेट मंत्रालय पातळीवर हालचाली सुरू झाल्या आहेत. येथील भाजपचे सक्रिय नगरसेवक रमेश भिका थोरात यांनी राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तथा कोल्हापूरचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांची भेट घेऊन त्यांचा सत्कार केला आणि सुरगाण्याच्या आरोग्य यंत्रणेची शोकांतिका त्यांच्या समोर मांडली. या भेटीत फक्त औपचारिक सत्कार नव्हता तर सुरगाण्याच्या जनतेच्या जीवाचा प्रश्न होता. भाजपा नाशिक जिल्हा उत्तरच्या वतीने दिलेल्या अधिकृत निवेदनात धक्कादायक वास्तव समोर आले आहे. सुरगाणा हा एकल आदिवासी तालुका आहे. येथील 90% जनता गरीब, कष्टकरी आदिवासी आहे. परंतु येथील ग्रामीण रुग्णालयात अत्यावश्यक सुविधा नाहीत. नगरसेवक थोरात यांनी निवेदनातून 3 प्रमुख मागण्या केल्या आहेत : 1. सोनोग्राफी मशीन : गरोदर महिलांची नियमित तपासणीसाठी सुरगाण्यापासून 50 ते 100 किमी लांब नाशिकला जावे लागते. यामुळे अनेक वेळा गरोदर महिला व बाळांच्या जीवाला धोका निर्माण होतो. 2. ऑक्सिजन आणि अतिदक्षता विभाग (ICU) : गंभीर आजारी रुग्ण किंवा आपत्कालीन परिस्थितीत ऑक्सिजन अभावी रुग्णांना थेट नाशिकला हलवावे लागते. वाटेतच अनेकांचे प्राण जातात.

3. अपघात ट्रॉमा केअर (Trauma Care Unit) : सुरगाणा-सापुतारा हा घाटाचा रस्ता अपघातप्रवण आहे. अपघात झाल्यास तातडीने उपचार मिळत नाहीत. त्यामुळे मृत्यूचे प्रमाण वाढले आहे. या गंभीर विषयावर आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

सुरगाणा तालुक्यातील आदिवासी आणि ग्रामीण जनतेचे आरोग्य हेच आमचे प्राधान्य आहे. तुमच्या मागण्यांवर गंभीरपणे विचार करून सोनोग्राफी मशीन, ICU आणि ट्रॉमा केअर युनिट लवकरात लवकर मंजूर करून सुरगाणा ग्रामीण रुग्णालयाचा कायापालट करू असे आश्वासन मंत्री महोदयांनी दिल्याचे समजते. नगरसेवक रमेश थोरात यांच्या या पाठपुराव्यामुळे सुरगाण्यातील आदिवासी जनतेला मोठी आशा निर्माण झाली आहे.

# ऑस्ट्रेलियन उच्च शिक्षण शिष्टमंडळाची पुण्याला भेट



पुणे : (स. गांवकरी)

ऑस्ट्रेलियन विद्यापीठे, उच्चशिक्षण संस्था आणि शालेय मंडळांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या २२ सदस्यीय ऑस्ट्रेलियन उच्च शिक्षण शिष्टमंडळाने 'ऑस्ट्रेड हायर एज्युकेशन वीक २०२६'चा भाग म्हणून १६ आणि १७ ऑगस्ट २०२६ रोजी पुण्याला भेट दिली. ऑस्ट्रेलिया आणि भारत यांच्यातील विद्यार्थी देवाणघेवाण वाढवणे आणि शैक्षणिक संबंध अधिक दृढ करणे, हा या भेटीचा प्रमुख उद्देश होता. ऑस्ट्रेलियन उच्च शिक्षण शिष्टमंडळाच्या या भेटीचे नेतृत्व ऑस्ट्रेलिया सरकारच्या 'ऑस्ट्रेलियन ट्रेड अँड इन्व्हेस्टमेंट कमिशन'ने केले. या उपक्रमाला पश्चिम ऑस्ट्रेलिया सरकारच्या 'इन्व्हेस्ट अँड ट्रेड वेस्टर्न ऑस्ट्रेलिया'चे सहकार्य लाभले. पुण्यात शिष्टमंडळाने विद्यापीठे आणि शाळांशी संवाद साधला. भारतीय विद्यार्थ्यांच्या बदलत्या अपेक्षा अधिक चांगल्या प्रकारे समजून घेणे, शैक्षणिक सहकार्य आणि विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक मार्गांच्या संधींचा शोध घेणे; तसेच ऑस्ट्रेलियन आणि भारतीय शैक्षणिक संस्थांमधील संबंध अधिक मजबूत करणे, यावर या संवादात भर देण्यात आला.

## थोडक्यात बातम्या...



### बचत गटाच्या माध्यमातून महिलांनी पुढे यावे; भाऊ म्हणून मी सोबत

किनवट (स. गांवकरी) : महिला आर्थिक विकास महामंडळाच्या 'नवतेजस्विनी' योजनेअंतर्गत प्रगती लोकसंचालित साधन केंद्र, किनवटची तेरावी वार्षिक सर्वसाधारण सभा गजानन महाराज मंगल कार्यालय येथे उत्साहात संपन्न झाली. सभेचे उद्घाटन आमदार भीमराव केराम यांच्या हस्ते झाले. यावेळी "बचत गटाच्या माध्यमातून महिलांनी पुढे यावे, भाऊ म्हणून मी आपल्या सोबत आहे," अशी ग्वाही आ. केराम यांनी दिली. तसेच प्रगती लोकसंचालित साधन केंद्रासाठी जागा व निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन त्यांनी दिले. कार्यक्रमाला नगराध्यक्ष सौ. सुजाताताई येंड्रलवार, माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, नगरसेवक प्रशांत कोरडे, रोहन राव, मा.वि.म. चे जिल्हा समन्वयक आनंद खेत्रे, नगरसेवक प्रशांत कोर्डे, स्वीय सहाय्यक नीलकंठ कातले यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी सुकेशनी कपाटे, कमळताई देशमुख, विशाल श्रोते (तालुका समन्वयक, माविम), अझहर सिद्धीकी (लेखापाल), सहयोगिनी भारती झलके, भाग्यशली भगत, शिंदू लिंबेकर, रविता कार्लेवर, प्रतिभा पाटील, प्रभावती शेंडे यांच्यासह महिला बचतगटांच्या पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. महिलांना उद्योग, स्वयंरोजगार व आर्थिक स्वावलंबनाच्या माध्यमातून सक्षम करण्यासाठी नवतेजस्विनी योजनेच्या विविध उपक्रमांचा यावेळी आढावा घेण्यात आला. महिलांच्या आर्थिक व सामाजिक सक्षमीकरणाचा संकल्प व्यक्त करत सभा उत्साहात संपन्न झाली.

### श्रावण मासासाठी हिमायतनगर पोलिसांचा चोख बंदोबस्त



हिमायतनगर (स. गांवकरी) : श्रावण मासाच्या पार्श्वभूमीवर शहर व परिसरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी हिमायतनगर पोलीस प्रशासनाने विशेष बंदोबस्ताची तयारी केली आहे. पोलीस निरीक्षक लक्ष्मण केंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली मोठा पोलीस फौजफाटा तैनात ठेवण्यात आला आहे. श्रावण महिन्यात मंदिरांमध्ये भाविकांची मोठी गर्दी होत असल्याने तसेच विविध धार्मिक कार्यक्रम व मिरवणुकांच्या पार्श्वभूमीवर कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिसांकडून विशेष खबरदारी घेण्यात येत आहे. यासाठी २९ होमगार्ड, ५ महिला होमगार्ड, ४ एपीआय अधिकारी आणि ४० पोलीस कर्मचारी असा पोलीस फौजफाटा बंदोबस्तासाठी सज्ज ठेवण्यात आला आहे. धार्मिक स्थळे, गर्दीची ठिकाणे, प्रमुख चौक तसेच संवेदनशील भागांमध्ये पोलिसांची विशेष नजर राहणार आहे. नागरिकांनी शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. श्रावण मासातील सर्व धार्मिक कार्यक्रम शांततेत व उत्साहात पार पडावेत, यासाठी पोलीस प्रशासनाकडून आवश्यक त्या उपाययोजना करण्यात आल्या असून कायदा व सुव्यवस्था भंग करणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

### ठाणे पोलीस आयुक्तालयात दोन दिवसीय कर्करोग निदान शिबिर संपन्न



ठाणे (स. गांवकरी) : ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या वतीने पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या दोन दिवसीय कर्करोग निदान (Cancer Detection) शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिराचा शुभारंभ काल सहपोलीस आयुक्त डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण आणि अतिरिक्त पोलीस आयुक्त (प्रशासन) डॉ. शिवाजी राठोड यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. शिबिराच्या पहिल्या दिवशी देशातील नामवंत कर्करोग तज्ज्ञांकडून ५०० हून अधिक पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. सदर शिबिराच्या दुसऱ्या दिवशीही ५०० हून अधिक पोलीस अधिकारी व कर्मचारी सहभागी होतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. या शिबिरात पद्मभूषण डॉ. रमाकांत देशपांडे तसेच डॉ. बिमान दावर यांसारखे प्रख्यात कर्करोग तज्ज्ञ उपस्थित राहून विविध प्रकारच्या कर्करोगांबाबत मार्गदर्शन करणार आहेत. तसेच कर्करोगाची लक्षणे, वेळेवर निदानाचे महत्त्व आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबतही उपस्थितांना सविस्तर माहिती देण्यात आली. सदर शिबिरास पोलीस आयुक्त श्री. आशुतोष डुंबरे, अतिरिक्त पोलीस आयुक्त श्री. अशोक धुडे तसेच अन्य वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी भेट दिली. शिबिरात सहभागी झालेल्या डॉक्टर, सहआयोजक आणि या उपक्रमासाठी योगदान देणाऱ्या मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. पोलीस दलातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करून गंभीर आजारांचे वेळेत निदान व्हावे, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेला हा उपक्रम अत्यंत महत्त्वपूर्ण असून, पोलीस दलाकडून या सामाजिक व आरोग्यविषयक उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# निंभोरा शिवारातील ६६ हजारांच्या गायींची चोरी उघड; चार आरोपी अटकेत

## निंभोरा पोलिसांची धडक कारवाई; गुप्त माहिती, तांत्रिक विश्लेषण व सीसीटीव्हीच्या आधारे आरोपी निष्पन्न



**अटक केलेले आरोपी**

- हयात शेख मासून मन्यार, वय २५, रा. मन्यारवाडा, चिनावल, ता. रावेर
- शेख आवेश शेख एजाज खान, वय २०, रा. ख्वाजानगर, सावदा, ता. रावेर
- शेख राजीद शेख शरीफ, वय २३, रा. ईदगाहजवळ, रसलपूर, ता. रावेर
- शेख नासीर शेख चांद, वय ४५, रा. वरणगाव, ता. भुसावळ

रावेर : (स. गांवकरी)

रावेर तालुक्यातील निंभोरा बुद्रुक येथील सबस्टेशनजवळील वाड्यातून दोन शेतकऱ्यांच्या चार गायी चोरीला गेल्याच्या गुन्ह्याचा निंभोरा पोलिसांनी छडा लावला आहे. या प्रकरणी पोलिसांनी चार आरोपींना अटक केली असून, सुमारे ६६ हजार रुपये किमतीच्या चार गायींच्या चोरीचा गुन्हा उघडकीस आणला आहे.

निंभोरा बुद्रुक येथील लक्ष्मण गोविंदा बोढे (वय ६५) आणि त्यांच्या शेजारील वाड्यातील शेतकरी सुपडू विश्वनाथ नेमाडे यांच्या निंभोरा शिवारातील सबस्टेशनजवळील वाड्यातून २९ जुलै २०२६ रोजी रात्री चार गायी चोरीला गेल्या होत्या. त्यापैकी दोन गायींची किंमत २२ हजार रुपये, तर अन्य दोन गायींची किंमत ४४ हजार रुपये होती. अशा एकूण ६६ हजार रुपये किमतीच्या चार गायी अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्या होत्या.

गायींचा सर्वत्र शोध घेऊनही त्या न सापडल्याने निंभोरा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. त्यानुसार सीसीटीएनएस गुन्हा रजिस्टर क्रमांक १७२/२०२६, भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) अन्वये अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्ह्याचा तपास करून आरोपींचा शोध घेण्याच्या सूचना पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक (जळगाव) संदीप गावित आणि उपविभागीय पोलीस अधिकारी (फैजपूर) अनिल बडगुजर यांनी तपास पथकाला दिल्या. त्यानुसार तपास पथकाने गुप्त बातमीदारांकडून मिळालेली माहिती, तांत्रिक विश्लेषण आणि सीसीटीव्ही चित्रणाच्या आधारे तपासाची चक्रे फिरवली. सखोल तपासानंतर चोरीच्या गुन्ह्यातील चार आरोपी निष्पन्न करून त्यांना अटक करण्यात आली. चौघांना पोलिसांनी अटक केली असून, पुढील तपास सुरू आहे. ही यशस्वी कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक मीरा देशमुख, पोलीस हेड कॉन्स्टेबल अविनाश पाटील आणि पोलीस कॉन्स्टेबल किरण कोळी यांच्या तपास पथकाने केली.

# अक्कलकोटच्या कर्तृत्ववान शिलेदारांचा गौरव!



अक्कलकोट : (स. गांवकरी)

पुणे शहरात गावगाथा मीडिया नेटवर्कच्या वतीने आयोजित केलेल्या 'अक्कलकोट भूषण व रत्न पुरस्कार सोहळा २०२६' मध्ये उपस्थित राहून अक्कलकोट तालुक्यातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वांचा सन्मान करण्याचा योग आला. आपल्या कर्तृत्वातून अक्कलकोटचे नाव पुण्यासह राज्यभरात उज्ज्वल करणाऱ्या व्यक्तींचा गौरव होताना विशेष अभिमान वाटला. यावेळी अक्कलकोट भूषण पुरस्काराचे मानकरी श्री. जन्मेजयराजे भोसले महाराज, श्री. मल्लिनाथ कलशेट्टी, श्री. माधव राजगुरू आणि श्री. शरणकुमार लिंबाळे यांचा यावेळी गौरव करण्यात आला. तसेच अक्कलकोट रत्न पुरस्काराचे मानकरी पौर्णिमाताई गायकवाड, श्री. बंडोपंत कुलकर्णी, श्री. महेश बोळकोटगी, श्री. रविकांत पाटील, श्री. वीरभद्र हारकूड, श्री. गणेश फुलारी, श्री. संजीवकुमार हिळ्ळी, श्री. चंद्रशेखर भांगे, श्री. सिद्धार्थ कापसे, डॉ. अमोगसिद्ध चेंडके आणि ॲड. सदाशिव माळगे यांचाही सन्मान करून या सर्व मान्यवरांचे अभिनंदन केले. नोकरी, व्यवसाय, प्रशासन, न्यायव्यवस्था, पोलीस सेवा, उद्योग, शिक्षण, साहित्य, पत्रकारिता आणि सामाजिक कार्य अशा विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या या कर्तृत्ववान अक्कलकोटकरांची यशोगाथा निश्चितच प्रेरणादायी आहे.

# राहुरी शहरात साकारतयं पुरातन मंदिराचे नवं रूप

राहुरी : (स. गांवकरी)



कासार गल्ली राहुरी येथील अनेक भक्तांचे श्रध्दास्थान व जागृत असे देवस्थान श्री शुक्रेश्वर मंदिराचे गर्भगृहाचे तसेच कलशाचे काम जलद गतीने चालु आहे. मंदिरासाठी आतापर्यंत अनेक भाविकांनी दिलेल्या दानातुन मंदिर पुर्णत्वास येत आहे. सर्वच स्तरातील लोक, व्यापारी, राहुरी येथुन नोकरीनिमित्ताने किंवा अन्य कारणाने बाहेरगावी गेलेले रहिवासी तसेच राहुरी येथील माहेरवाशीन यांनी त्यांच्या ईच्छेप्रमाणे वस्तुरुपात व आर्थिक स्वरुपात भरभरुन दान दिलेले आहे. विशेष बाब म्हणजे आतापर्यंत या मंदिरास मदतीचा ओघ कधीही थांबलेला नाही. मंदिरामध्ये पुर्वी ज्या स्थापित होत्या त्याच नव्याने स्थापित करावयाच्या मुर्ती कि ज्यामध्ये श्रीगणेश; पंचमुखी महादेव आणि नंदी; श्री गुरुदेव दत्त; श्रीराम दरबार; विठ्ठल रुक्मिणी; दुर्गा माता; वीर हनुमान, श्री साईबाबा या देवतांचा समावेश आहे. या सर्व मुर्त्यांसाठी जयपुर येथील प्रसिध्द मुर्तीकार ज्यांनी श्रीक्षेत्र अयोध्या येथील श्रीराम मंदिरामध्ये मुर्त्या घडविल्या आहेत त्यांना ऑर्डर देण्यात आलेली आहे. कलश व मुर्तीमध्ये सर्व ग्रामस्थांचा, भाविक भक्तांचा सहभाग असला पाहिजे आणि त्यामुळे सर्व भाविक भक्तांना मंदिराच्या कळस व मुर्तीसाठी मदतीचे विनम्र आवाहन करण्यात येत आहे. मंदिरामध्ये श्रावण महिना असल्याने नेहमीप्रमाणे दर सोमवारी दुपारी १२.०० वाजता महादेवाची महाआरती होत असते. सदर आरतीसाठी सर्वांनी उपस्थित रहावे अशी विनंती करण्यात येत आहे. तसेच, आपण यथाशक्तीप्रमाणे, आपल्या कुटुंबियांमार्फत, आपले स्नेही, आप्तेष्ट यांच्या वतीने मंदिराचा कळस व मंदिरामध्ये स्थापित करावयाच्या मुर्तीसाठी आर्थिक स्वरुपात किंवा वस्तुरुपात मदत करावी यासाठी देखील मदतीचे विनम्र आवाहन करण्यात येत आहे.

# तडवळ जिल्हा परिषद शाळेत मूलभूत सुविधांचा बोजवारा

## सहा महिन्यांपासून सीसीटीव्ही बंद, जुन्या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याची मागणी

सोलापूर : (स. गांवकरी)



अक्कलकोट तालुक्यातील तडवळ येथील जिल्हा परिषद शाळेतील मूलभूत सुविधांचा प्रश्न गंभीर बनला असून, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. ५० वर्षांहून अधिक जुनी झालेल्या शाळेच्या इमारतीला ठिकठिकाणी तडे गेले आहेत. त्यातच स्वच्छतागृहांची दुरवस्था, नादुरुस्त पाणीपुरवठा, सहा महिन्यांपासून बंद असलेली सीसीटीव्ही यंत्रणा आणि किचन शेडमध्ये उंदीर-घुशींचा वाढलेला वावर यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्य व सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. तडवळ शाळेत मराठी, कन्नड आणि उर्दू माध्यमांचे वर्ग भरतात. मोठ्या संख्येने विद्यार्थी शिक्षण घेत असताना त्यांना आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधाच उपलब्ध नसल्याची स्थिती आहे. शाळेच्या जुन्या इमारतीच्या भिंतींना तडे गेल्याने पावसाळ्यात विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेची चिंता अधिक वाढली आहे. त्यामुळे इमारतीचे तातडीने स्ट्रक्चरल ऑडिट करून धोकादायक भागाची पाहणी करण्याची मागणी पालक व ग्रामस्थांनी केली आहे.

विद्यार्थ्यांना पोषण आहार देण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या किचन शेडची अवस्था विशेष चिंताजनक आहे. शेडमध्ये उंदीर आणि घुशींचा मोठ्या प्रमाणात वावर असल्याचा आरोप पालकांनी केला आहे. अन्न शिजविले जाणाऱ्या ठिकाणी स्वच्छता आणि कीटकनियंत्रणाच्या उपाययोजनांकडे दुर्लक्ष होत असल्याने विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. किचन शेडमधील उंदरांचा प्रादुर्भाव नियंत्रणात आणण्यासाठी काय उपाययोजना कराव्यात, याबाबत मुख्याध्यापक गौतम कांबळे यांनी माध्यम प्रतिनिधीलाच विचारल्याने त्यांच्या भूमिकेवरही ग्रामस्थांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. पोषण आहाराच्या ठिकाणी नियमित स्वच्छता, निर्जंतुकीकरण आणि कीटकनियंत्रणाची व्यवस्था करणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी असल्याचे पालकांचे म्हणणे आहे.

शाळेतील स्वच्छतागृहांची अवस्थाही दयनीय आहे. स्वच्छतागृहांची दारे बंद असून पाणीपुरवठ्याची टाकी नादुरुस्त असल्याने विद्यार्थ्यांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत असल्याचा आरोप आहे. मुला-मुलींना स्वच्छतागृहासाठी बाहेर जावे लागत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. त्यामुळे मुलींच्या सुरक्षिततेसह स्वच्छतेचा प्रश्नही निर्माण झाला आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी बसविण्यात आलेली सीसीटीव्ही यंत्रणाही गेल्या सहा महिन्यांपासून बंद असल्याचे सांगण्यात येते. शाळेच्या आवारात कोणतीही अनुचित घटना घडू नये, यासाठी सीसीटीव्ही सुरू असणे आवश्यक असताना त्याच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप पालकांनी केला आहे. शाळेच्या दुरवस्थेबाबत प्रशासनाकडे वारंवार निधीची मागणी करण्यात आल्याचा दावा सरपंच संतोष कुंभार, उपसरपंच शंकर ग्वाडयाळ आणि पालक सुभाष बरूरे यांनी केला आहे. मात्र, अद्याप ठोस उपाययोजना झाल्या नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

दरम्यान, गटशिक्षणाधिकारी प्रशांत अरबळे यांनी नुकतीच शाळेला भेट दिली. मात्र, या भेटीत शाळेतील धोकादायक इमारत, स्वच्छतागृह, पाणीपुरवठा, सीसीटीव्ही आणि किचन शेडमधील समस्यांकडे पुरेसे लक्ष देण्यात आले नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या सर्व बाबींची स्वतंत्र चौकशी करून जबाबदारी निश्चित करण्याची मागणीही होत आहे.

# विकासकामांचे भूमिपूजन; आमदार नंदकिशोर महाजन यांच्या हस्ते शुभारंभ

## आमदार चंद्रकांत पाटील यांच्या निधीतून रस्ता काँक्रीटीकरणाचे काम; ग्रामस्थांची दळणवळणाची सुविधा होणार अधिक सुकर

रावेर : (स. गांवकरी)



रावेर तालुक्यातील महत्त्वाचे गाव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तांदलवाडी येथे मुक्ताईनगर मतदारसंघाचे आमदार चंद्रकांतभाऊ पाटील यांच्या निधीतून मंजूर झालेल्या रस्ता काँक्रीटीकरणाच्या कामाचे भूमिपूजन जळगाव विधानपरिषदेचे आमदार नंदकिशोरभाऊ महाजन यांच्या हस्ते उत्साहात पार पडले.

या रस्ता काँक्रीटीकरणाच्या कामामुळे तांदलवाडीतील ग्रामस्थांची दैनंदिन वाहतूक अधिक सुकर होणार असून, नागरिकांना सुरक्षित आणि सुविधाजनक दळणवळणाची सुविधा उपलब्ध होणार आहे. गावाच्या विकासाच्या दृष्टीने या कामाला महत्त्वाचे स्थान असल्याचे यावेळी उपस्थितांनी सांगितले.

तांदलवाडीच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेली विविध विकासकामे मार्गी लावण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहणार असल्याचा विश्वास आमदार नंदकिशोरभाऊ महाजन यांनी यावेळी व्यक्त केला.

या कार्यक्रमास कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती तथा भारतीय जनता पक्षाचे माजी युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष श्रीकांतभाऊ महाजन, तांदलवाडीच्या सरपंच सुरेखाताई तायडे, ग्रामपंचायत सदस्या आशाताई पाटील, साधना योगेश्वर कोळी, वर्षाताई पाटील, ग्रामपंचायत सदस्य नारायणभाऊ पाटील, शशांकभाऊ पाटील, शिवसेना पदाधिकारी तथा आदिवासी कोळी बहुउद्देशीय शिखर संस्था रावेर तालुका अध्यक्ष मनोहरभाऊ कोळी सुलवाडी, शिवसेना उपसमन्वयक रावेर तालुका योगेश्वर कोळी, भारतीय जनता पक्षाचे अल्पसंख्याक तालुका अध्यक्ष जाबिरभाई बेग खिर्डी, सामाजिक कार्यकर्ते सिद्धार्थ तायडे सर, दत्तात्रय तायडे सर, शिवसेना शाखाप्रमुख सागर खवले यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

तसेच गोकुळ चौधरी, श्रीकांत चौधरी, दत्तुभाऊ कांडेले, रमेश नमायते, महेंद्र महाजन, अरुण जैस्वाल, मगनलाल जैस्वाल, दिनेश कुंभार, मनोज चौधरी, अतुल चौधरी, गोकुळ शेंगदाणे, विठ्ठल भोई, दिलीप भोई यांच्यासह तांदलवाडी ग्रामस्थ, महायुतीतील भारतीय जनता पक्ष, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरूषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 । पाने : ४ । वर्ष : ४ थे । अंक : २५१। किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
# समर्थ गांवकरी
संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




सोमवार दि. २४ ऑगस्ट २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## नव्याने स्थापन झालेल्या शहापूर भूमिपुत्र कंत्राटदार सामाजिक संघटनेचा आज एकत्रित एल्गार!

**ठाणे (समर्थ गांवकरी)**

नव्याने स्थापन झालेल्या शहापूर भूमिपुत्र कंत्राटदार सामाजिक संघटनेच्या वतीने आज शहापूर तालुक्यातील भूमि पुत्र ठेकेदार व उपठेकेदारांची एकत्रित बैठक घेण्यात आली. या बैठकीस शहापूर तालुक्यातील जवळपास १०० ते १५० ठेकेदार व उपठेकेदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी प्रत्येक ठेकेदाराने आपल्या अडचणी, व्यथा, काम करताना येणाऱ्या समस्या आणि प्रत्येक कामाम गे निर्माण होणाऱ्या अडथळ्यांबाबत आपले अनुभव मांडले.

अधिकाऱ्यांकडून होणारी कथित चुकीची वागणूक, कामांच्या प्रक्रियेत वाढत जाणारी टक्केवारीची मागणी, प्रत्येक कामामागे पैशांचा तगादा लावून निर्माण केल्या जाणाऱ्या अडचणी तसेच कंत्राटदारांची होत असलेली कथित पिळवणूक याबाबत बैठकीमध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली.

वन विभागातील कामांबाबत गंभीर प्रश्न उपस्थित

विशेषतः वन विभागातील कामांबाबत अनेक गंभीर प्रश्न कंत्राटदारांनी उपस्थित केले. काही अधिकाऱ्यांकडून परस्पर संगनमताने बाहेरील परवानाधारक कंत्राटदारांच्या नावावर कामे घेऊन प्रत्यक्षात ती कामे स्वतःच केल्याचा आरोप बैठकीमध्ये करण्यात आला.

शहापूर तालुक्यातील भूमिपुत्र कंत्राटदारांना डावलून बाहेरील कंत्राटदारांना कामे दिली जात असल्याबाबतही उपस्थित कंत्राटदारांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

मागील काही वर्षांमध्ये वन विभागामध्ये झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या कामांमध्ये अनियमितता अथवा गैरप्रकार झाले आहेत का, याची माहिती अधिकृत कागदपत्रे, निविदा प्रक्रिया आणि माहितीच्या अधिकारातून मिळवून त्याची वस्तुनिष्ठ पडताळणी करण्याची आवश्यकता असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यपद्धतीबाबतही नाराजी

तसेच शहापूरमधील सार्वजनिक बांधकाम विभागातील नव्याने नियुक्त झालेले डेप्युटी इंजिनिअर तसेच नव्याने नियुक्त झालेले कार्यकारी अभियंता यांच्या कार्यपद्धतीबाबतही अनेक ठेकेदारांनी नाराजी व्यक्त केली.

कामांच्या प्रक्रियेत अनावश्यक हस्तक्षेप केला जात असल्याचा आरोप काही कंत्राटदारांनी केला. तसेच विविध उपविभागांमध्ये अधिकाऱ्यांच्या माध्यम ातून कंत्राटदारांवर दबाव निर्माण केला जात असल्याच्या तक्रारीही बैठकीत मांडण्यात आल्या.

अधिकारी वर्गाने कंत्राटदारांच्या कामामध्ये प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष भागीदारी मागणे, दबाव आणणे किंवा आर्थिक मागण्या करणे हे अत्यंत गंभीर प्रकार असून, अशा कोणत्याही प्रकाराला संघटितपणे विरोध करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.

माहितीच्या अधिकारातून वस्तुस्थिती समोर आणण्याचा निर्णय

या सर्व प्रश्नांवर केवळ चर्चा न करता कायदेशीर आणि लोकशाही मार्गाने ठोस पावले उचलण्याचा निर्णय घेण्यात आला.

संघटनेच्या माध्यमातून आवश्यक त्या ठिकाणी पदाधिकारी व प्रतिनिधी नियुक्त करून संबंधित कामांची माहिती, निविदा प्रक्रिया, मंजुरी, निधी, कामाचे आदेश, बिलांची माहिती तसेच



इतर आवश्यक कागदपत्रे माहितीच्या अधिकारातून (RTI) मागविण्यात येणार आहेत.

अधिकाऱ्यांकडून नियमबाह्य पद्धतीने कामे केली जात असल्याचे किंवा संगनमताने गैरप्रकार होत असल्याचे पुराव्यांवरून आढळल्यास, संबंधित सक्षम प्रशासनिक प्राधिकरणाकडे लेखी तक्रारी करून चौकशीची म ागणी करण्यात येईल. तसेच भ्रष्टाचार अथवा लाच मागितल्याचे ठोस पुरावे उपलब्ध असल्यास, कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करून संबंधित भ्रष्टाचार प्रतिबंधक यंत्रणेकडे तक्रार करण्याबाबतही बैठकीत चर्चा करण्यात आली. एखाद्या अधिकाऱ्याकडून वारंवार नियमबाह्य वर्तन, कंत्राटदारांची पिळवणूक किंवा अधिकाराचा गैरवापर होत असल्याचे पुराव्यांसह निदर्शनास आल्यास, संबंधित वरिष्ठ अधिकारी, जिल्हा प्रशासन आणि शासनाच्या सक्षम यंत्रणांकडे ठोस पुराव्यांसह पाठपुरावा करून कारवाईची मागणी करण्यात येईल.

भूमिपुत्र कंत्राटदारांच्या हक्कांसाठी संघटित लढा

या सर्व प्रश्नांवर एकजुटीने आवाज उठवण्याचा आणि शहापूर तालुक्यातील भूमिपुत्र कंत्राटदारांच्या हक्कांसाठी कायदेशीर व लोकशाही म ार्गाने संघटितपणे लढा देण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला.

बैठकीमध्ये कंत्राटदारांनी मांडलेल्या विविध समस्यांवर ठोस ठराव मांडण्यात आले असून, पुढील काळात प्रशासनाकडे त्याबाबत प्रभावीपणे पाठपुरावा करण्याचे निश्चित करण्यात आले.

## महाराष्ट्रात पाऊस पुन्हा फॉर्मात येणार, कोणत्या जिल्ह्यांमध्ये जोरात बरसणार ?

**मुंबई (समर्थ गांवकरी)**



संपूर्ण राज्याचे लक्ष लागून राहिलेल्या पावसाने पुन्हा एकदा महाराष्ट्राकडे मोर्चा वळवल्याचे चित्र आहे. बंगालच्या उपसागरात नव्याने कमी दाबाचे क्षेत्र निर्माण होण्याची शक्यता असल्याने राज्यातील काही भागांत पावसाला पोषक वातावरण तयार झाले आहे. त्यामुळे पावसाच्या स्थितीत पुन्हा बदल होण्याची शक्यता असून अनेक भागांत पावसाच्या सरी कोसळण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, आज उत्तर म हाराष्ट्रातील धुळे, जळगाव आणि नाशिक जिल्ह्यांत विजांच्या कडकडाटासह पाऊस होण्याची शक्यता आहे. तर विदर्भातील गोंदिया जिल्ह्यात सध्या जोरदार पावसाच्या सरी सुरू असून पुढील काही तास पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे गोंदिया जिल्ह्यासाठी येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. राज्यातील उर्वरित भागांत काही ठिकाणी ढगाळ वातावरण राहण्यासह तुरळक ठिकाणी हलक्या सरींची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

दरम्यान, नागपूर जिल्ह्यात मागील दोन दिवसांपासून हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाने हजेरी लावल्याने शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळाला आहे. आज सकाळपासून नागपूरम ध्ये ढगाळ वातावरण असून आज आणि उद्या विदर्भातील काही भागांत हलक्या पावसाची शक्यता आहे. मात्र, २६ ते २८ ऑगस्टदरम्यान विदर्भातील बहुतांश भागांत चांगला पाऊस होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. बंगालच्या उपसागरात निर्माण होणाऱ्या कमी दाबाच्या क्षेत्राचा परिणाम विदर्भातील पावसावर होण्याची शक्यता आहे.

गोंदिया जिल्ह्यात २२ ऑगस्टच्या रात्रीपासून पावसाची रिपरिप सुरू होती. आज सकाळपासून पावसाचा जोर वाढल्याने वातावरणात गारवा निर्माण झाला आहे. हा पाऊस

## मुंबईत 'भुलेश्वरचा राजा'च्या आगमन मिरवणुकीत घडलेल्या दुर्घटनेबाबत मुख्यमंत्री फडणवीसांनी केला शोक व्यक्त

**मुंबई (समर्थ गांवकरी)**



मुंबईतील भुलेश्वर परिसरात 'भुलेश्वरचा राजा' गणेशमूर्तीच्या आगमन मिरवणुकीदरम्यान शनिवारी (दि. २२ ऑगस्ट) रात्री मोठी दुर्घटना घडली. २२ फूट उंचीची गणेशमूर्ती मंडपात आणत असताना अचानक तोल गेल्याने मूर्ती खाली कोसळली. या दुर्घटनेत चौघे जखमी झाले असून उपचारादरम्यान दोघांचा मृत्यू झाला.

अखिल भुलेश्वर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे कार्यकर्ते आणि पदाधिकारी २२ फूट उंचीची गणेशमूर्ती वाजतगाजत भुलेश्वरमधील कबुतरखाना परिसरात आणत होते. रात्री सुमारे ९.५० वाजता मूर्ती परिसरात पोहोचली असताना अचानक तिचा तोल गेला आणि मूर्ती मंडळाच्या कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांच्या अंगावर कोसळली. दुर्घटनेनंतर जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले.

या दुर्घटनेत मंडळाचे अध्यक्ष आणि शिवसेनेचे उपविभाग प्रमुख संकेत नेवशे (३३) यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. तसेच ब्रिजेश जोशी (३०) यांच्या छातीला गंभीर मार लागल्याने उपचारादरम्यान त्यांचाही मृत्यू झाला. इतर दोघांवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मुख्यमंत्र्यांकडून शोक व्यक्त

या दुर्घटनेनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर पोस्ट करत मृत गणेशभक्तांना श्रद्धांजली वाहिली. हि घटना अत्यंत दुर्दैवी आणि मन हेलावून टाकणारी असल्याचे त्यांनी म्हटले. जखमी गणेशभक्तांवर रुग्णालयात उपचार सुरू असून त्यांची प्रकृती लवकर सुधारावी, अशी प्रार्थना करत त्यांनी मृतांच्या कुटुंबीयांप्रती शोक व्यक्त केला.

## भारताच्या पहिल्या बुलेट ट्रेनसाठी १६ चालकांची नियुक्ती; जपानमध्ये वर्षभर विशेष प्रशिक्षण

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या संचालनासाठी मनुष्यबळाची तयारी वेगाने सुरू झाली आहे. नॅशनल हायस्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेडने (NHSRCL) प्रकल्पासाठी १६ हायस्पीड रेल्वे चालकांची नियुक्ती केली असून, या सर्व चालकांना जपानमध्ये एक वर्षाचे विशेष प्रशिक्षण देण्यात आले आहे. जपानी शिंकान्सेन तंत्रज्ञानावर आधारित या प्रकल्पासाठी चालकांना अत्याधुनिक तंत्रज्ञानासोबतच सुरक्षा मानके आणि कार्यपद्धतीचे प्रशिक्षण देण्यात येत आहे.

मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाची लांबी ५०८ किलोमीटर असून, गुजरातमधील वापी ते साबरम ती हा टप्पा डिसेंबर २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. तर मुंबई ते साबरमती संपूर्ण मार्ग डिसेंबर २०२९ पर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. रेल्वे रूळ, विद्युतीकरण, सिग्नलिंग, दूरसंचार आणि इतर पायाभूत सुविधांची कामे पूर्ण झाल्यानंतर प्रकल्पाच्या संचालनाची अचूक वेळ निश्चित केली जाणार आहे.

चालकांना विशेष वेतनश्रेणी

नियुक्त करण्यात आलेल्या बुलेट ट्रेन चालकांचा समावेश अ-कार्यकारी (NE)-4 श्रेणीत करण्यात आला आहे. त्यांना ४० हजार ते १.२५ लाख रुपयांची औद्योगिक महागाई भत्ता (IDA) वेतनश्रेणी लागू आहे. याशिवाय NHSRCLच्या नियमांनुसार विविध भत्ते आणि इतर सुविधाही मिळणार आहेत.

२६० कर्मचाऱ्यांना जपानी भाषेचे प्रशिक्षण

प्रकल्पासाठी केवळ चालकांनाच प्रशिक्षण दिले जात नसून इतर कर्मचाऱ्यांनाही जपानी कार्यपद्धती आणि संस्कृतीशी परिचित करून दिले जात आहे. आतापर्यंत सुमारे २६० कर्मचाऱ्यांनी मूलभूत जपानी भाषा आणि संस्कृतीचे प्रशिक्षण घेतले आहे. तसेच NHSRCLच्या अनेक अधिकाऱ्यांनी जपानी भाषा प्रावीण्य परीक्षा (JLPT) उत्तीर्ण करून छ१ ते छ५ स्तरांपर्यंतची प्रमाणपत्रे मिळवली आहेत.

५०८ किमी मार्गावर तीन आगार

बुलेट ट्रेनच्या रेकची नियमित तपासणी, देखभाल आणि दुरुस्तीसाठी ठाणे, सुरत आणि साबरमती येथे आगार उभारण्यात येत आहेत. या आगारांमध्ये आपत्कालीन देखभाल, रेकची दुरुस्ती, री-प्रोफाइलिंग तसेच




उपकरणे आणि बोगींच्या देखभालीसाठी स्वतंत्र सुविधा उपलब्ध असतील.

साबरमती येथील रोलिंग स्टॉक आगारात हलकी तसेच मोठी देखभाल करण्याची सुविधा असेल. सुरुवातीला चार तपासणी मार्गिका आणि दहा देखभाल-दुरुस्ती मार्गिका उभारल्या जाणार आहेत. प्रवासी सेवा वाढल्यानंतर तपासणी मार्गिका आठ आणि देखभाल-दुरुस्ती मार्गिका २१ करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

## पत्रकार सुशील थोरात यांच्यावरील हल्ल्याचा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाकडून तीव्र निषेध

**कोपरगाव (समर्थ गांवकरी)**

नुकताच अहिल्या नगर शहरात पत्रकार सुशील थोरात यांच्यावर पाइपलाइन रोड येथे झालेल्या हल्ल्याचा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे सरचिटणीस डॉ विश्वासराव आरोटे व वरिष्ठ पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा सरचिटणीस जनार्दन जगताप व कोपरगाव तालुका अध्यक्ष प्रा विजय कापसे यांच्या वतीने प्रसिद्धी पत्रकाद्वारे तीव्र निषेध व्यक्त करत दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. या पत्रकात म्हटले आहे की, पत्रकारांवर होणारे हल्ले ही अत्यंत गंभीर बाब असून, पत्रकारांना निर्भयपणे काम करण्यासाठी सुरक्षित वातावरण निर्माण करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. पत्रकारावर हल्ला करून त्यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न कोणत्याही परिस्थितीत सहन केला जाणार नाही.

पत्रकार सुशील थोरात यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा आम्ही जाहीर निषेध करतो. या हल्ल्याचा जाब आम्ही विचारणार असून, दोषींवर तातडीने कठोर कारवाई झाली पाहिजे. पत्रकारांच्या सुरक्षिततेशी कोणतीही तडजोड केली जाणार नाही, अशी भूमिका महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे वतीने व्यक्त करण्यात आली आहे. दरम्यान, उपअधीक्षक टिपरसे यांच्यासह पोलीस प्रशासनाने या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे. हल्ल्याचे नेमके कारण, हल्लेखोरांची ओळख आणि घटनेमागील पार्श्वभूमी तपासून दोषींवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य संघटक संजय भोकरे प्रदेश अध्यक्ष निलेश सोमाणी राज्य सरचिटणीस डॉक्टर विश्वासराव आरोटे यांनी देखील वरिष्ठ स्तरावर केली आहे.

## युवकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासह विविध क्षेत्रांत सहभाग वाढविण्याला प्राधान्य : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**नागपूर (समर्थ गांवकरी)**

शिक्षण कौशल्य, क्रीडा स्टार्टअप आदी क्षेत्रात युवा पिढीचा सकारात्मक सहभाग आहे. त्यांचा हा सहभाग वाढविण्यासोबतच संपूर्ण मदत देण्यात येईल त्यासोबत स्टार्टअप इकोसिस्टीम मध्ये चर्चा करून चांगली पॉलिसी तयार करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यांनी आज दिली.

रेशीमबाग मैदानावर मुख्यमंत्र्यांच्या प्रमुख उपस्थितीत 'मंथन फॉर युवा' या या उपक्रमांतर्गत ढोल ताशा पथकाचा जागतिक विक्रम तसेच विविध क्षेत्रातील आयकॉन असलेल्या व्यक्तींसोबत थेट संवाद, नशामुक्त महाराष्ट्र व देश यासाठी युवकांना शपथ आदी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी २५ हजार पेक्षा जास्त युवक व युवतींनी सहभाग नोंदवला.

महाराष्ट्राची परंपरा असलेल्या ढोल ताशा पथकाने एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स, इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स आणि वर्ल्ड रेकॉर्ड्स बुक ऑफ इंडियामध्ये जागतिक विक्रम नोंदविला आहे. आधार नोंद असलेल्या ५८५ ध्वजधारकांच्या या उपक्रमामुळे जागतिक विक्रमाची नोंद झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विश्वविक्रम केल्याबद्दल संपूर्ण चमूचे अभिनंदन केले.

## भारतीय रेल्वेचा नवा विक्रम; पहिल्या डबल-स्टॅक लाँग-हॉल कंटेनर ट्रेनची यशस्वी धाव

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

भारतीय रेल्वेने मालवाहतुकीच्या क्षेत्रात महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. जवाहरलाल नेहरू पोर्ट (गछ्झढ) येथून गुजरातमधील वडोदरा विभागातील वर्णमा येथील कॉनकॉरच्या ऋउढ टर्मिनलपर्यंत पहिली 'डबल-स्टॅक लाँग-हॉल' कंटेनर ट्रेन यशस्वीपणे चालवण्यात आली. या ट्रेनने एकाच फेरीत तब्बल ३६० ढएण कंटेनर्सची वाहतूक करत सुमारे ४२२ किलोमीटरचे अंतर पार केले.

या लाँग-हॉल ट्रेनमध्ये प्रत्येकी ४५ वॅगन्स असलेले दोन डबल-स्टॅक रेक्स जोडण्यात आले होते. पुढील रेकचे वजन १,८१७ टन असून त्यासाठी लोको क्रमांक ६०३११, तर मागील रेकचे वजन २,१०५ टन असून त्यासाठी लोको क्रमांक २४६९० वापरण्यात आले.

या प्रयोगामुळे एका ट्रेनमधून मोठ्या प्रमाणात कंटेनर्सची वाहतूक करण्याची क्षमता सिद्ध झाली आहे. त्यामुळे बंदरे आणि मालवाहतूक टर्मिनल्सवरील गर्दी कमी होण्यासोबतच कंटेनर्सचा मुक्काम कालावधी कमी होऊन मालाची जलद वाहतूक होण्यास मदत होणार आहे.

वेळ आणि खर्चात बचत

एकाच फेरीत अधिक कंटेनर्सची वाहतूक झाल्याने लोकोमोटिव्ह आणि कंटेनर फ्लॅट वॅगन्सची गरज कमी होईल. तसेच समान प्रमाणातील माल वाहून नेण्यासाठी लागणाऱ्या ट्रेनच्या फेऱ्याही कमी होतील. परिणामी,



रेल्वे मार्गाच्या उपलब्ध क्षमतेचा अधिक कार्यक्षम वापर होऊन मालवाहतुकीचा वेळ आणि खर्च कमी होण्याची अपेक्षा आहे.



# पैसा, सत्ता आणि गुंडशाहीपुढे विद्वत्ता काम करत नाही.निवृत्ती महाराज इंदोरीकर...!

**वैजापुर (समर्थ गांवकरी)**

वैजापूर तालुक्यातील खंडाळा येथे २८१ व्या संत शंकर स्वामी महाराज सप्ताहा कीर्तनात ईदोरीर महाज बोलतांना म्हणाले

आपल्या विशेष विनोदी शैलीने प्रबोधन करून उपस्थित भाविकांना त्यांनी मंत्रमुग्ध केले.

आजच्या समाजव्यवस्थेत पैसा,सत्ता आणि गुंडशाहीला वाढते महत्त्व मिळत असल्याने विद्वत्ता व ज्ञानाला अपेक्षित सन्मान मिळत नाही, अशी खंत प्रसिद्ध कीर्तनकार निवृत्ती महाराज इंदोरीकर यांनी व्यक्त केली.

समाजातील बदलत्या परिस्थितीवर भाष्य करताना इंदोरीकर महाराज म्हणाले की, केवळ पैसा किंवा सत्ता असून माणूस मोठा होत नाही.खरे मोठेपण हे ज्ञान, संस्कार, प्रामाणिकपणा आणि कर्तृत्वातून निर्माण होते.मात्र सध्याच्या परिस्थितीत पैसा,राजकीय सत्ता आणि दहशतीच्या बळावर अनेकजण समाजात आपले वर्चस्व निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

माणूस लाचार झाला की तो आपला स्वाभिमान विकतो आणि स्वाभिमान विकला की पैसा, सत्ता व दबावापुढे सत्य आणि विद्वत्तेलाही किंमत उरत नाही.

तरुणांनी या प्रवाहाला बळी न पडता शिक्षण,कष्ट आणि चांगल्या विचारांची कास धरावी.समाजाच्या प्रगतीसाठी विद्वत्ता आणि संस्कार यांना पुन्हा प्रतिष्ठा मिळणे गरजेचे आहे,असेही त्यांनी सांगितले.

पैसा आणि सत्ता क्षणिक असते.मात्र ज्ञान,संस्कार आणि चांगले कर्तृत्व माणसाच्या आयुष्यभर सोबत राहते असा संदेश त्यांनी यावेळी दिला.

संसाराचे सुख क्षणिक असून पारमार्थिक सुख चिरकाल टिकते, संसाराला परमार्थाची जोड आवश्यक असल्याचे त्यांनी कीर्तनात सांगितले कोणत्याही क्षेत्रात काम करतांना नीतीने व कष्ठाने करत सहनशक्ती वाढवुन क्रोधावर नियंत्रण ठेवण्याचे आवाहन केले.

जिल्हा परीषद शाळा वाचवण्याचे आव्हान केले.

शेवटि बोलतांना महाराज म्हणाले

जिल्हा परिषद शाळा वाचवण्याचे आव्हान इंदोरीकर महाराज

जिल्हा परिषद शाळा या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाचे महत्त्वाचे केंद्र आहेत. या शाळांची पटसंख्या कमी होत असताना त्या टिकवण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने पुढाकार घेण्याची गरज आहे. जिल्हा परिषद शाळा वाचवा, ग्रामीण विद्यार्थ्यांचे शिक्षण वाचवा,असे आवाहन इदोरीकर महाराज



यांनी केले.

ग्रामीण भागातील सर्वसामान्य कुटुंबातील मुलांना दर्जेदार शिक्षणाची संधी जिल्हा परिषद शाळांमधून मिळते. त्यामुळे पालकांनी आपल्या मुलांना या शाळांमध्ये दाखल करून शाळांच्या विकासासाठी शिक्षकांना सहकार्य करावे. केवळ शासन किंवा शिक्षकांची जबाबदारी न मानता पालक, ग्रामस्थ आणि लोकप्रतिनिधींनीही शाळांच्या गुणवत्तावाढीसाठी पुढाकार घ्यावा,असे मत इंदोरीकर महाराज यांनी व्यक्त केले.

शाळा वाचली तर गावाचे भविष्य वाचेल आणि गावाचे भविष्य वाचले तर समाजाची प्रगती होईल,असा संदेश देत त्यांनी जिल्हा परिषद शाळांच्या संवर्धनासाठी सर्वांनी एकत्र येण्याचे आवाहन केले.

संस्थानचे अध्यक्ष साऱधर महाराज भोपळे यांच्या प्रमुख उपस्थितीत सुरू असलेल्या सप्ताहात ३५ हजार भाविकांनी घेतला मह्यप्रसादाचा लाभ...,!

याकीर्तनाला भाविकांनी उपस्थिती लावून ज्ञानदानासह महाप्रसादाचा लाभ घेतला. हा सोहळा पार पाडष्यासाठी दोन हजार स्वयंसेवक अहोरात्र श्रमदानकरत आहेत. सप्ताहाच्याशेवटच्या दिवशी महप्रसादसाठी ६० क्विंटलपेक्षा अधिक प्रसाद तयार करण्यात येत आहे. श्रीशंकर स्वामीमहाराजांच्या सप्ताहात सर्वधर्मसमभावाचे अनोखे दर्शनघडले. कीर्तनासाठीच्या मुख्य मंडपाची जागामुस्लिम बांधव अक्रम पठाण यांनी दिली, तरमहप्रसाद बनवण्यासाठीलागणारे भंडारगह व भोजनासाठी बौद्धबांधव भीमराव खंडिझोड यांनी आपली शेतजमीनउपलब्ध करून दिली.तसेच सोमवारच्या एकादशीनिमित्त माजी ठपनगराध्यक्ष हाजी अकील शेख यांच्या वतीने संपुर्ण दिवसाच्या फराळाची पंगत देण्यात येणार आहे.

# वाळूचोरांवर मोठी कारवाई,१६ लाखांचा अवैज जप्त

**कोपरगाव (समर्थ गांवकरी)**

कोपरगाव तालुक्यातील पूर्व वाहिनी गोदावरी नदी वाळूचोराची उजाड करून टाकले असून अजूनही ते थांबण्यास तयार असल्याचे दिसून येत नाही.त्यामुळे शिर्डी उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांनी टाकलेल्या धाडीत एकूण पाच ट्रॅक्टर्स सह १६ लाख ०५ हजाराचा अवैज कोपरगाव शहर पोलिसांनी जप्त केला असून आरोपी विशाल ठकीनाथ लव्हाटे यांच्या मुसक्या आवळल्या असून अन्य चार ट्रॅक्टरवरील आरोपींनी पोलिसांच्या हातावर तुरी दिल्या असल्याचे उघड झाले आहे.त्यामुळे वाळूचोरांत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

कोपरगाव तालुक्यातील गोदावरी नदीपात्रातून सुरू असलेला अवैध वाळू उपसा अत्यंत चिंताजनक बनला आहे.मळेगाव थडी,सांगावी भुसार,मायगाव देवी,सोनारी,कुंभारी,आणि सुरेगाव परिसरामध्ये महसूल व पोलीस प्रशासन कारवाई करत असले,तरीही रात्रीच्या वेळी होणाऱ्या चोरट्या उपशामुळे नदीचे पात्र उद्ध्वस्त होत आहे.परिणामी नदीपात्रात मोठे खड्डे पडल्याने भूजल पातळी खालावली आहे.जलचर आणि नदीकाठच्या परिसराचे मोठे नुकसान होत आहे.शिवाय वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्या अवजड वाहनांमुळे ग्रामीण रस्ते मोठ्या प्रमाणावर खराब झाले आहेत.प्रशासकीय कारवाई महसूल विभाग आणि पोलिसांनी वेळोवेळी धाडी टाकून ट्रॅक्टर,हुक व इतर साहित्य जप्त केले आहे.अवैध धंदे करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे,परंतु दंडात्मक कारवाईनंतरही उपसा पूर्णपणे थांबलेला नाही.सुरेगाव शिवारात तेथील कार्यकर्ते खबर देऊनही संबंधित यंत्रणा कारवाई करत नाही असा त्यांचा निराशाजनक अनुभव आहे.परिणामी पोलिस आणि महसूल प्रशासन हातची घडी आणि तोंडावर बोट ठेवण्याची भूमिका घेताना ग्रामस्थांना आढळून येतआहे.त्यामुळे बऱ्याच वेळा जिल्हा पोलिस अधीक्षक यांचे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस अधिकारी आणि शिर्डी उपविभागीय पोलिस अधिकारी आपली पथके पाठवून कारवाई करताना दिसून येत आहे.अशीच कारवाई काल रात्रीच्या सुमारास झाली असून यात डाऊच खुर्द शिवारात शिर्डी येथील पथकाला गुप्त खंबर मिळाल्याने त्यांनी आपले पथक घटनास्थळी पाठवले होते. त्याठिकाणी त्यांना एकूण पाच ट्रॅक्टर वाळू चोर करताना आढळून आले होते. दरम्यान जप्त केलेल्यां वाहनांत एक ५ लाख ०५ हजार रुपये किमतीचा एक विना नंबरचा निळ्या रंगाचा स्वराज ७३५ कंपनीचा ट्रॅक्टर,त्याचा चेसिस नंबर-९६३६८२४३९ असा असून त्यास लाल रंगाची ट्रॉली तिचा क्रमांक एम.एच.२० ए.वाय. ७०७९ असा आहे.त्यात अंदाजे ५हजार रुपये किमतीची एक ब्रास शासकिय गौण खनिज वाळु असलेली आरोपी विशाल लव्हाटे याचे ताब्यात मिळाली आहे.तर अन्य ३ लाख रुपये किमतीचा एक विना नंबरचा भगव्या रंगाचा स्वराज ७४४ एफ.ई.मॉडेल या कंपनीचा ट्रॅक्टर त्याचा चेसिस नंबर डब्ल्यू. डब्ल्यू.सी. इ.-४०६०००३८९३६ असा असलेला,३,लाख रुपये किमतीचा एक विना नंबरचा भगव्या रंगाचा स्वराज ७४४ एफ.ई.कंपनीचा ट्रॅक्टर त्याचा चेसिस नंबर डब्ल्यू.डब्ल्यू.सी. ए.-४०६०६०३४२१२ असा असलेला,याशिवाय ३ लाख रुपये किमतीचा एक विना नंबरचा निळ्या रंगाचा स्वराज ७४४ एफ. ई.कंपनीचा ट्रॅक्टर त्याचा चेसिस नंबर क्यू.एस. टी.डी.-४०६०६००९००० असा असलेला,तर २ लाख रुपये किमतीचा एक विना नंबरचा फिकट लाल रंगाचा स्वराज ८५५ कंपनीचा ट्रॅक्टर त्याचा चेसिस नंबर-८५३२००२६ व इंजिन नंबर ४७१२३७-९५३०९०४ असा असलेला असे एकूण पाच ट्रॅक्टर आढळून आले आहे.त्यांचा एकूण जप्त केलेला ऐवज १६ लाख ०५ रुपयांचा असल्याची माहिती पोलिस अधिकाऱ्यांनी दिली आहे.घटनास्थळी पोलिस निरीक्षक उद्धव डमाळे,पोलिस हेडकॉन्स्टेबल किशोर जाधव आदींनी भेट दिली आहे. दरम्यान या प्रकरणी कोपरगाव शहर पोलिसांनी पो.हे.कॉ.अशोक रामा शिंदे यांच्या फिर्यादीवरून आपल्या दप्तरी गुन्हा क्र.भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२)३,(५) प्रमाणे आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.पुढील तपास पोलिस निरीक्षक डमाळे यांचे मार्गदर्शनाखाली करत आहे

## खेळाडूंच्या अडचणी सोडविण्यासाठी सदैव पाठीशी राहणार : उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार



**पुणे (समर्थ गांवकरी)**

बदलत्या युगात नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार करून महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे कामकाज पेपरलेस करण्याच्या उद्देशाने असोसिएशनच्या जिल्हा संघटकांसह तांत्रिक समितीला लॅपटॉपचे वितरण उपमुख्यमंत्री तथा महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या अध्यक्ष सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आले. खेळ आणि खेळाडूंच्या सन्मानासाठी तसेच त्यांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी आपण सदैव पाठीशी राहू, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री तथा क्रीडा मंत्री श्रीमती पवार यांनी दिली.

या कार्यक्रमाला असोसिएशनच्या उपाध्यक्ष अश्विनी पाटील, सरचिटणीस डॉ. चंद्रकांत जाधव, कार्याध्यक्ष सचिन गोडबोले, खजिनदार गोविंद शर्मा, शिवछत्रपती क्रीडा संघटक पुरस्कार प्राप्त जनार्दन शेळके, अर्जून पुरस्कार प्राप्त सुरेखा कुलकर्णी, श्रीरंग इनामदार उपस्थित होते. उपमुख्यमंत्री श्रीमती पवार म्हणाल्या, बदलत्या युगामध्ये नवीन तंत्रज्ञान स्वीकारणे ही काळाची गरज बनली असून लॅपटॉपमुळे पेपरलेस कामकाजाला सुरुवात होईल. स्व. अजित दादांनी खो-खो खेळाच्या चौफेर प्रगतीसाठी अत्यंत तळमळीने प्रयत्न केले. त्यांच्याच संकल्पनेतून पेपरलेस कामकाजासाठी लॅपटॉप वितरण होत असल्याचे सांगितले.

बारामतीत ऑक्टोबरमध्ये कै. भाई नेरुरकर चषक स्पर्धा

कै. भाई नेरुरकर चषक राज्यस्तरीय खो-खो स्पर्धा ही महाराष्ट्रातील एक महत्त्वाची व प्रतिष्ठित खो-खो स्पर्धा दरवर्षी घेण्यात येते. महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र खो-खो असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा राज्यभरात वेगवेगळ्या ठिकाणी आयोजित केली जाते.

# लोडशेडिंग बंद करा, स्मार्ट मीटरला विरोध; शेंडी येथे ग्रामस्थांचे आंदोलन!

**महावितरणकडून सामाजिक कार्यकर्ते अनंत घाणे यांना लेखी आश्वासन; नियमित वीजबिल देण्याचीही मागणी!**

**अकोले (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील वारंघुशी, बारी, पेंडशेत, रतनवाडी, वाकी, मुतखेल, शेंडी, कोलडेंभे तसेच परिसरातील गावांमध्ये सुरू असलेले लोडशेडिंग कायम स्वरूपी बंद करावे, स्मार्ट मीटर बसविण्यास विरोध असून त्याऐवजी साधे मीटर बसवावेत आणि ग्राहकांना दर महिन्याला वेळेत वीजबिल देण्यात यावे, या विविध मागण्यांसाठी दि. २१ ऑगस्ट रोजी शेंडी येथील महावितरण कार्यालयावर शेतकरी व ग्रामस्थांनी शांततेच्या मार्गाने आंदोलन केले.

मा. आमदार वैभवभाऊ पिचड यांच्या मार्गदर्शनाखाली सामाजिक कार्यकर्ते अनंत घाणे यांच्यासह ग्रामस्थांनी यापूर्वी दि. १९ ऑगस्ट रोजी महावितरणच्या शेंडी कार्यालयात निवेदन देऊन लोडशेडिंग बंद करण्याची मागणी केली होती. मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला होता. मात्र, लोडशेडिंग सुरूच राहिल्याने ग्रामस्थांनी आंदोलनाचा निर्णय कायम ठेवला. यावेळी चौकातून घोषणाबाजी करत शेतकरी व ग्रामस्थ महावितरण कार्यालयावर दाखल झाले.

रात्री सहा ते नऊ या वेळेत वीजपुरवठा खंडित होत असल्याने भातशेतीची कामे, जनावरांची देखभाल, दूध काढणे, घरातील स्वयंपाक तसेच विद्यार्थ्यांच्या अभ्यासात मोठ्या अडचणी निर्माण होत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. महिला, विद्यार्थी तसेच आश्रमशाळेतील निवासी विद्यार्थ्यांनाही लोडशेडिंगचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. पावसाळ्यात अंधाराच्या वेळी सर्पदंशाचा धोका वाढत असून परिसरात बिबट्या व इतर वन्यप्राण्यांचा वावर असल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही निर्माण होत



असल्याचे आंदोलनकर्त्यांनी अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले.

तसेच रतनवाडी-घारघर-देवगाव फिडर नियमित व कायमस्वरूपी सुरू ठेवावेत, अशी मागणीही करण्यात आली. ग्राहकांना वेळेवर वीजबिले मिळत नसल्याने तीन-चार महिन्यांची बिले एकत्र येतात आणि ग्राहकांवर एकाच वेळी मोठा आर्थिक भुर्दंड पडतो. त्यामुळे दर महिन्याला नियमित वीजबिल देण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली. स्मार्ट मीटर बसविण्यास ग्रामस्थांनी स्पष्ट विरोध दर्शवत साधे मीटर बसविण्याची मागणी केली.

आंदोलनावेळी महावितरणचे उपअभियंता विठ्ठल सोनवणे, सहाय्यक अभियंता सचिन बेंडकुळे व दत्तू भोईर यांनी आंदोलकांशी चर्चा केली. अधिकाऱ्यांनी लेखी स्वरूपात आश्वासन देताना यापुढे लोडशेडिंग होऊ नये यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येत असून काही ठिकाणी फिडर सुरू करण्याचे काम सुरू असल्याचे सांगितले. स्मार्ट मीटर व नियमित वीजबिलाच्या मागण्या वरिष्ठ कार्यालयाकडे कळविण्यात येतील, असेही स्पष्ट करण्यात आले.

## गावापासून जिल्हा रुग्णालयापर्यंत 'मानकांनुसार आरोग्यसेवा'; रुग्णालयनिहाय सुविधा निश्चित : मंत्री प्रकाश आबिटकर

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

राज्यातील नागरिकांना त्यांच्या गरजेनुसार दर्जेदार, सुलभ आणि वेळेत आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने रुग्णालयनिहाय आरोग्यसेवांची सर्वसमावेशक मानके निश्चित केली आहेत. ग्रामीण रुग्णालयापासून उपजिल्हा, सामान्य आणि जिल्हा रुग्णालयापर्यंत कोणत्या स्तरावर कोणत्या आरोग्य सुविधा, तज्ज्ञ डॉक्टर, तपासण्या, मनुष्यबळ, औषधे आणि पूरक सेवा उपलब्ध असाव्यात, याची स्पष्ट रूपरेषा निश्चित करण्यात आल्याची माहिती सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली. यासंदर्भातील शासन निर्णय नुकताच जारी करण्यात आला आहे.

मंत्री आबिटकर यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आलेल्या या निर्णयामुळे राज्यातील शासकीय रुग्णालयांमधील आरोग्यसेवा अधिक सुसूत्र आणि परिणामकारक होण्यास मदत होणार आहे. नागरिकांना आपल्या गरजेनुसार योग्य आरोग्य संस्थेची निवड करणे सुलभ होणार असून, सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेतील पारदर्शकता आणि नागरिकांचा विश्वास आणखी दृढ होणार आहे.

रुग्णालयाच्या क्षमतेनुसार उपचारांची स्पष्ट व्यवस्था

ग्रामीण रुग्णालयापासून ३०, ५० व १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय,



सामान्य रुग्णालय आणि जिल्हा रुग्णालय अशा विविध स्तरांवर उपलब्ध होणाऱ्या सेवांचे निकष निश्चित करण्यात आले आहेत. रुग्णालयाची क्षमता आणि सेवा स्तर लक्षात घेऊन तज्ज्ञ वैद्यकीय सेवा, नर्सिंग, अलाइड हेल्थ व पॅरामेडिकल मनुष्यबळ, प्रयोगशाळा, रेडिओलॉजी आणि इतर रुग्णसेवांची उपलब्धता निश्चित करण्यात आली आहे.

फिजिशियन, सर्जन, स्त्रीरोग व प्रसूती तज्ज्ञ, बालरोग तज्ज्ञ, अस्थिव्यंग तज्ज्ञ, नेत्रशल्यचिकित्सक, भूलतज्ज्ञ, रेडिओलॉजिस्ट, दंतशल्यचिकित्सक आदी तज्ज्ञ सेवांचा रुग्णालयाच्या स्तरानुसार समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे आवश्यक उपचार स्थानिक पातळीवरच उपलब्ध करून देण्यास चालना मिळणार असून, रुग्णांना उपचारासाठी दूरच्या शहरांकडे जाण्याची गरज कमी होणार आहे.




# सेनेत ९९ टक्के ठेकेदार-महिला जिल्हाध्यक्षांचा आरोप !

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर जिल्ह्यातील एकनाथ शिंदे सेनेत एक टक्का सामाजिक कार्यकर्ते असून ९९ टक्के ठेकेदार असल्याची प्रखर टीका शिंदे सेनच्या महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा विमल पुंडे यांनी करून आपला राजीनामा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचेकडे पाठवून दिल्याने नगर जिल्ह्यात शिंदे सेनेच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यात शिवसेना (शिंदे गट) पक्षात कार्यकर्त्यांच्या वानवेबाबत किंवा संघटनेच्या विस्ताराबाबत विविध राजकीय चर्चा सुरू असतात.पक्ष फुटल्यानंतर जिल्ह्यात काही ठिकाणी ताकद वाढवण्यासाठी प्रयत्न झाले असले,तरी स्थानिक पातळीवर पक्षांतर्गत समन्वय,जुने-नवे कार्यकर्ते यांचा मेळ घालणे आणि प्रभाव टिकवून ठेवण्याबाबत राजकीय वर्तुळात नेहमी उलट सुलट चर्चा सुरू असल्याचे पाहायला मिळाले आहे.काही महिन्यापूर्वी उद्योग मंत्री उदय सावंत यांनी श्रीरामपूर भेटीत पक्ष संघटना विसर्जित केली असून प्रभारी पदाधिकारी नेमले होते.मात्र त्यानंतर भाकरी फिरवली असल्याचे दुर्दैवाने दिसून आले नाही.त्याची जोरदार चर्चा नगर जिल्ह्यात झाली होती.शिवसेनेत फूट पडल्यानंतर जिल्ह्यात शिंदे गटाने पकड मजबूत करण्याचा प्रयत्न केला,परंतु तळागाळातील कार्यकर्त्यांचे जाळे विस्तारताना काही आजी-माजी पदाधिकाऱ्यांमध्ये अजूनही सुसंवादाचा अभाव असल्याचा सूर वारंवार उमटतो.जिल्ह्यात महायुतीमधील इतर पक्ष (भाजपा किंवा राष्ट्रवादी) आणि महाविकास आघाडी (ठाकरे गट व काँग्रेस) यांच्याशी असलेली तीव्र स्पर्धा कार्यकर्त्यांवर प्रभाव पाडत असल्याचे दिसून येत आहे.स्थानिक कार्यकर्त्यांना व पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेऊन पक्ष संघटन वाढवणे आणि आगामी निवडणुकांच्या तोंडावर पकड निर्माण करणे हे शिंदेंच्या शिवसेनेसमोर मोठे आव्हान असताना त्याबाबत नाव घेण्यासारखे काम करताना दुर्दैवाने कोणीही दिसून येत नाही. अनेक जण फक्त आपल्याला फुकटचे आर्थिक घबाड कसे मिळेल या विवंचेत असल्याचे दिसून येत आहे.अनेक नवीन आणि हितेशी कार्यकर्त्यांची यामुळे मोठी गोची होताना दिसून येत आहे.त्यामुळे वरिष्ठ नेते नाराज असल्याच्या बातम्या असताना कोपरगाव येथील महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा विमल पुंडे यांनी आपला राजीनामा दिल्याने आणि घोळ वाढला असल्याचे दिसून येत आहे.

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता, कुकडी वितरण बांधकाम विभाग,कोळवडी,**
**ता.कर्जत, जि. अहिल्यानगर यांचे कार्यालय**

पत्ता:- कुकडी वसाहत कोळवडी,ता.कर्जत,जि.अहिल्यानगर पिन- ४१४४०२ ईमेल:- kdcdkolwadi.engineer83gmail.com

**ई-निविदा सूचना क्रमांक -०९ सन २०२६-२७**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, कुकडी वितरण बांधकाम विभाग कोळवडी, ता- कर्जत, जि- अहिल्यानगर,जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरिता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, कुकडी वितरण बांधकाम विभाग कोळवडी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ. क्र. | कामाचे नाव | जिल्हा | निविदेची किंमत रुपये (लक्ष मध्ये) | ई निविदा उपलब्ध कालावधी | ई निविदा उघडण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | सिना उजवा कालवा सा.क्र. २४/३८० येथील पाईप ॲक्वाडक्ट व त्यालगतचे VRB चे बांधकाम करणे व अन्य अनुषंगिक कामे करणे. | अहिल्यानगर | १५५.३६ | दिनांक २४/०८/२०२६ ते दिनांक ३१/०८/२०२६ | दिनांक ०२/०९/२०२६ |

जा.क्र.कुविबांवि/लेशा-२/ ३१५८ /सन २०२६
कुकडी वितरण बांधकाम विभाग,कोळवडी,
ता-कर्जत, जि.अहिल्यानगर
दिनांक-१८/०८/२०२६

**आरओसी - २०२६-२७/क्र-५/सी२४३९**

**कार्यकारी अभियंता**
**कुकडी वितरण बांधकाम विभाग,कोळवडी.**
**ता. कर्जत, जि.अहिल्यानगर.**

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### मुदखेड पत्रकार संघाच्या वतीने तहसीलदार आनंद देऊळगावकर



मुदखेड (समर्थ गांवकरी)

मुदखेड चे कर्तव्यदक्ष तहसीलदार आनंद देऊळगावकर यांची उपजिल्हाधिकारीपदी पदोन्नती झाल्याबद्दल सत्कार व सन्मान करण्यात आला.

या प्रसंगी जिल्हा पत्रकार संघाचे संजय कोलते, गंगाधर डांगे, नामदेवराव राहेरे तसेच पत्रकार संघाचे नूतन तालुकाध्यक्ष दिनेश शर्मा, सचिव संतोष सावंत, कोषाध्यक्ष हाफिज कुरेशी, सहसचिव अमोल टेकले, पत्रकार शेख शमशोदिन, प्रल्हाद मस्के, रूकमाजी शिंदे आदी पत्रकार बांधवांची यांची उपस्थिती होती.

### दादी प्रकाशमाणी पुण्यतिथी निमित्त राहुरीत रक्तदान शिबीर




राहुरी (समर्थ गांवकरी)

राजयोगिनी दादी प्रकाशमणी यांच्या १९ व्या पुण्यतिथी निमित्त विश्व बंधुत्व दिवस तथा सोमवार दि. २४ ऑगष्ट २०१६ रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती राहुरीच्या राजयोग भवन ब्रम्हाकूमारीज यांच्या वतिने देण्यात आली .

प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय यांच्या वतीने राजयोगिनी दादी प्रकाशमणी यांच्या पुण्यतिथी निमित्त दरवर्षी विश्व बंधुत्व दिवसाचे आयोजन करण्यात येते. ब्रम्हाकूमारीज यांच्या समाज सेवा प्रभागाच्या वतीने राहुरी येथील राजयोग भवन येथे सोमवार दिनांक २४ ऑगस्ट २०२६ रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे .

सकाळी दहा वाजेपासून दुपारी दोन वाजेपर्यंत या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे . या शिबिरात राहुरी शहर व तालुक्यातील युवा युवती तरुण व जास्तीत जास्त नागरिकांनी सहभाग नोंदवावा , असे आवाहन राजयोग भवनच्या ब्रम्हाकूमारी नंदा दीदी यांनी केले आहे.

### आळेफाटा येथे विश्वबंधुत्व रक्तदान महाअभियान उत्साहात संपन्न

#### ८४ नागरिकांचे रक्तदान



आळेफाटा (समर्थ गांवकरी)

राजयोगिनी दादी प्रकाशमणी यांच्या १९ व्या पुण्यस्मृतिदिनानिमित्त आळेफाटा ब्रह्माकुमारीज सेंटर आणि राजयोग सेवा प्रभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विश्वबंधुत्व रक्तदान महाअभियानाचे आयोजन करण्यात आले होते.

हे रक्तदान शिबिर आळेफाटा येथील ब्रह्माकुमारीज सेंटरमध्ये सकाळी ९ ते दुपारी ५ या वेळेत पार पडले. यावेळी आळेफाटा परिसरातील तरुण-तरुणी, महिला, व्यापारी व नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत ८४ नागरिकांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली.याप्रसंगी ब्रह्माकुमारीज सेंटरच्या संचालिका ब्र.कु.शितल दीदी यांनी दादी प्रकाशमणी यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. त्या म्हणाल्या, दादीजींनी संपूर्ण जीवन विश्वबंधुत्व आणि मानवसेवेसाठी समर्पित केले. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असून, यातून अनेकांचे प्राण वाचतात. हाच खरा दादीजींना आदरांजली वाहण्याचा मार्ग आहे. शिबिर यशस्वी करण्यासाठी ब्रह्माकुमारीज सेंटरच्या सेवाधारी बंधू-भगिनींनी विशेष परिश्रम घेतले.

### बंगालच्या उपसागरात मालवाहू जहाज बुडाले

#### २४ क्रू मेंबर्सचा शोध सुरू, ओडिशाच्या किनाऱ्याजवळ मोठी दुर्घटना

नवी दिल्ली (समर्थ गांवकरी)

बंगालच्या उपसागरात शनिवारी पनामा ध्वज असलेले मालवाहू जहाज बुडाल्याची धक्कादायक घटना घडली. हे जहाज ओडिशातील पारादीप किनाऱ्यापासून सुमारे २४० नॉटिकल मैल अंतरावर समुद्रात बुडाले. जहाजावर एकूण २४ क्रू मेंबर्स असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे. दुर्घटनेनंतर भारतीय तटरक्षक दल आणि भारतीय नौदलाकडून शोध आणि बचाव मोहीम सुरू करण्यात आली आहे.



# धार्मिक परंपरेत विखे पाटील परिवाराचे योगदान!

## धनगरवाडीतील अखंड हरिनाम सप्ताह कमिटीकडे १०१ साखर पोती सुपूर्त

राहाता (समर्थ गांवकरी)

राहाता तालुक्यातील धनगरवाडी येथे सद्गुरू महंत गंगागिरीजी महाराज यांच्या १७९व्या अखंड हरिनाम सप्ताहानिमित्त विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याच्या वतीने १०१ साखर पोती सप्ताह कमिटीकडे सुपूर्त करण्यात आली. धार्मिक आणि सामाजिक परंपरा मध्ये योगदान देण्याची विखे पाटील परिवाराची सक्रीयता पुन्हा एकदा अधोरेखित झाली.

धनगरवाडी येथे आयोजित करण्यात आलेला अखंड हरिनाम सप्ताह हा परिसरातील भाविकांसाठी श्रद्धा, भक्ती आणि अध्यात्माचा मोठा सोहळा आहे. सप्ताहाच्या आयोजनासाठी आवश्यक असलेल्या साखरेची गरज लक्षात घेऊन पद्मश्री डॉ विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याच्या वतीने १०१ साखर पोती सप्ताह कमिटीकडे सुपूर्त करण्यात आली.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि भाजप प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांच्या मार्गदर्शनातून यंदाच्या सप्ताहामध्ये योगदान देण्याचा निर्णय घेण्यात आला.विखे पाटील परिवाराने जिल्ह्यातील धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांसह वारकरी सांप्रदाया मध्ये नेहमीच योगदान आणि सहकार्य करण्याची परंपरा कायम ठेवली आहे. धनगरवाडीतील या भक्तिमय सोहळ्यालाही कारखान्याच्या माध्यमातून मोलाचे सहकार्य करण्यात आले.

यावेळी विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याचे व्हा चेअरमन सोपानराव शिरसाठ, एम.डी. महेश कोनापुरे, संचालक लाटे पाटील, ताटे पाटील, यादव पाटील यांच्यासह कारखान्याचे पदाधिकारी, ग्रामस्थ आणि सप्ताह कमिटीचे पदाधिकारी उपस्थित होते.

धार्मिक परंपरा जपत समाजाशी असलेले जिव्हाळ्याचे नाते अधिक दृढ करण्याचे काम विखे पाटील परिवार सातत्याने करत असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. अखंड हरिनाम सप्ताहाच्या माध्यमातून धनगरवाडी परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून, सप्ताह कमिटीकडे करण्यात आलेल्या या सहकार्याबद्दल आयोजक आणि ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.





# रक्षाबंधनानिमित्त महाराष्ट्रातील बँकांना सार्वजनिक सुट्टी जाहीर करा

## महाराष्ट्र प्रदेश बँक वर्कर्स ऑर्गनायझेशनची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी

मुंबई (समर्थ गांवकरी)

येत्या २८ ऑगस्ट २०२६ रोजी साजऱ्या होणाऱ्या रक्षाबंधन सणानिमित्त महाराष्ट्रातील सर्व बँकांना 'निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट्स अ‍ॅक्ट, १८८१' अंतर्गत सार्वजनिक सुट्टी जाहीर करावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश बँक वर्कर्स ऑर्गनायझेशनने राज्याचे मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे केली आहे. संघटनेचे अध्यक्ष श्री. गौतम कुलकर्णी आणि सरचिटणीस (महामंत्री) श्री. प्रकाश नाहार यांनी १९ ऑगस्ट २०२६ रोजी मुख्यमंत्र्यांना निवेदन पाठवून ही मागणी केली आहे. ही संघटना एन.ओ.बी.डब्ल्यू., भारतीय मजदूर संघाशी संलग्न आहे.

रक्षाबंधनाचे सांस्कृतिक महत्त्व

रक्षाबंधन हा भाऊ-बहिणीच्या पवित्र नात्याचे प्रतीक असलेला भारतीय संस्कृतीतील महत्त्वाचा सण आहे. या दिवशी बहिणी भावाला राखी बांधून त्याच्या दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा देतात. त्यामुळे हा सण कुटुंबीयांसोबत साजरा करण्यासाठी बँक कर्मचाऱ्यांना सुट्टी मिळणे आवश्यक असल्याचे संघटनेने निवेदनात नमूद केले आहे.

बँक कर्मचाऱ्यांना कौटुंबिक अडचणी

बँकांचे नियमित कामकाज सुरू असल्यामुळे अनेक कर्मचाऱ्यांना रक्षाबंधनाचा सण आपल्या कुटुंबीयांसोबत साजरा करता येत नाही. विशेषतः बँकिंग क्षेत्रात महिला कर्मचाऱ्यांची संख्या मोठी असून, दिवसभर बँकेत कामकाज असल्याने त्यांना कौटुंबिक परंपरेनुसार रक्षाबंधन साजरे करताना अडचणी येतात, असे संघटनेचे म्हणणे आहे.

छत्तीसगडच्या धर्तीवर महाराष्ट्रातही निर्णयाची मागणी

छत्तीसगड राज्य शासनाने रक्षाबंधनानिमित्त 'निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट्स अ‍ॅक्ट, १८८१' अंतर्गत बँक सुट्टी जाहीर केली आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्र शासनानेही २८ ऑगस्ट २०२६ रोजी राज्यातील बँकांना सार्वजनिक सुट्टी जाहीर करावी, अशी मागणी संघटनेने केली आहे.

# निमगांव शिवारात शॉर्टसर्किटमुळे गोठ्याला आग तीन जनावरे जळून खाक

## पशुधनासह शेतातील साहित्य खते जळून खाक

अर्धापूर (समर्थ गांवकरी)

तालुक्यातील निमगांव शिवारातील शेतातील गोठ्याला विद्युत शॉर्टसर्किटमूळे आग लागून गोठ्यात बांधलेली गाय, म्हैस आणि एक कालवड अशी तीन जनावरांचा होरपळून मृत्यू झाला. तर गोठ्यात ठेवलेली रासायनिक खतांची पोते आणि गहु-ज्वारीच्या पोत्यासह नांगर, कडबाकुट्टी,शेतीचे लाकडी अवजारे आदी साहित्य जळून खाक झाले आहेत. ही घटना दि. २१ ऑगस्ट रोजी रात्री घडली असून शनिवारी सकाळी उघडकीस आली आहे. या जळीत घटनेत शेतकऱ्यांचे अंदाजे दोन लाखाचे नुकसान झाले आहे.

निमगांव येथील उपसरपंच वसंतराव रामधन चव्हाण यांच्या शेत गट नं. १९ मध्ये जनावरांचा गोठा आहे. या गोठ्यावरुन ३३ के. व्ही. विद्युत तारा गेलेल्या आहेत. झाडाच्या फांद्या या विद्युत तारेमधून अचानक शॉर्टसर्किट होवून गवती छप्पर असलेल्या त्या जनावरांच्या गोठ्यावर अग्नीच्या ज्वाला पडून गोठ्याला आग लागली असावी असा अंदाज वर्तविल्या जात आहे. या आगीत जनावरांचा गोठा पुर्णत: जळून खाक झाला असून गोठ्यातील एक गाय, कालवड आणि एक म्हैस होरपळून मृत्यू झाले आहेत.



# मुदखेड मराठी पत्रकार परिषदेच्या तालुकाध्यक्षपदी दिनेश शर्मा तर उपाध्यक्ष पदी शेख इरफान, सचिव पदी संतोष सावंत, सहसचिव पदी अमोल टेकले, कोषाध्यक्ष पदी हाफिज कुरेशी यांची निवड

मुदखेड (समर्थ गांवकरी)



नांदेड जिल्हा मराठी पत्रकार संघानी जिल्ह्यातील सर्व तालुका कार्यकारिणी निर्माण करण्याची प्रक्रिया सुरू केली असून मराठी पत्रकार परिषदेच्या मुदखेड तालुका कार्यकारिणीची निवड गुरुवार, दिनांक २० ऑगस्ट रोजी शासकीय विश्रामगृह, मुदखेड येथे पार पडली.जिल्हाध्यक्ष संतोष पांडागळे यांनी मुदखेड तालुका कार्यकारणीच्या निवडीबाबत दिलेल्या सूचनेवरून जिल्हा संघटक संजय कोलते व जिल्हा सहसचिव ईश्वर पिनलवार यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या तालुकाध्यक्षपदी दिनेश शर्मा यांची निवड करण्यात आली.

यावेळी तालुका उपाध्यक्षपदी शेख इरफान, तालुका सचिवपदी संतोष सावंत,सहसचिव अमोल टेकले,तर तालुका कोषाध्यक्षपदी हाफिज कुरेशी यांची निवड करण्यात आली.

मुदखेड येथील शासकीय विश्रामगृहात झालेल्या या बैठकीस पत्रकार परिषदेचे पदाधिकारी व तालुक्यातील पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त अध्यक्ष एस एम.देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पत्रकारांच्या विविध प्रश्नांवर तसेच पत्रकार परिषदेच्या माध्यमातून भविष्यात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांवर यावेळी चर्चा करण्यात आली.

नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे उपस्थित मान्यवर व पत्रकार बांधवांनी अभिनंदन केले. पत्रकारांच्या समस्या शासन व प्रशासनाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी तसेच पत्रकारांच्या हक्कांसाठी संघटितपणे काम करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

यावेळी ज्येष्ठ पत्रकार प्रतापराव देशमुख,गंगाधर डांगे,देवानंद गूंजाळ,शेख अजगर हुसैन, नामदेव राहेरे, जयराम वने श्रीकांत देशमुख,शेख इमाम साब,साहेबराव हौसरे,सिद्धार्थ चौदंते,अतीक अहेमद,कुणाल चौधरी, रुखमाजी शिंदे,साहेबराव गागलवाड,ऊत्तम हनुमंते, अब्दुल रजाक,प्रल्हाद मसके,धम्मदाता कांबळे, किशोर पिल्लेवाड,पुंडलिक वच्चेवार,शिवाजी एडके,आशिष कल्याने,अब्दुल रज्ञाक,व्यंकटी मुंगल,संतोष दर्शनवाड,शेख शमशोद्दिन,म.हकीम,शेख जब्बार,राहुल कोलते,आदी पत्रकारांची उपस्थिती होती.

# पत्रकार सुशील थोरात यांच्यावरील हल्ल्याचा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाकडून तीव्र निषेध

मुंबई (समर्थ गांवकरी)

अहिल्या नगर जिल्ह्यातील पत्रकार सुशील थोरात यांच्यावर पाइपलाइन रोड येथे झालेल्या हल्ल्याचा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचो वतीने तीव्र निषेध करण्यात येत आहे. या हल्ल्यात थोरात गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

पत्रकारांवर होणारे हल्ले ही अत्यंत गंभीर बाब असून, पत्रकारांना निर्भयपणे काम करण्यासाठी सुरक्षित वातावरण निर्माण करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. पत्रकारावर हल्ला करून त्यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न कोणत्याही परिस्थितीत सहन केला जाणार नाही.

पत्रकार सुशील थोरात यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा आम्ही जाहीर निषेध करतो. या हल्ल्याचा जाब आम्ही विचारणार असून, दोषींवर तातडीने कठोर कारवाई झाली पाहिजे. पत्रकारांच्या सुरक्षिततेशी कोणतीही तडजोड केली जाणार नाही, अशी भूमिका महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे वतीने व्यक्त करण्यात आली आहे.

दरम्यान, उपअधीक्षक टिपरसे यांच्यासह पोलीस प्रशासनाने या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे. हल्ल्याचे नेमके कारण, हल्लेखोरांची ओळख आणि घटनेमागील पार्श्वभूमी तपासून दोषींवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य संघटक संजय भोकरे प्रदेश अध्यक्ष निलेश सोमाणी राज्य सरचिटणीस डॉक्टर विश्वासराव आरोटे यांनी केली आहे.

पत्रकारांवरील हल्ल्यांविरोधात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ ठामपणे पत्रकारांच्या पाठीशी उभे राहणार असून, या प्रकरणाचा शेवटपर्यंत पाठपुरावा केला जाईल, असा इशाराही संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.

# डॉ.जयश्रीताई थोरात यांच्या नेतृत्वात छात्रो की गुंज कार्यक्रमासाठी २००० विद्यार्थीनी

## खासदार राहुल गांधी यांच्या पुणे येथील कार्यक्रमासाठी संगमनेर मधून २००० विद्यार्थिनी

संगमनेर (समर्थ गांवकरी)

काँग्रेस पक्षाचे नेते खासदार राहुल गांधी हे पुणे येथे राज्यातील विद्यार्थ्यांशी संवाद साधणार असून छात्रों की गुंज या कार्यक्रमासाठी काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य मा.प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली व संगमनेर तालुका युवक काँग्रेसच्या अध्यक्षा डॉ.जयश्रीताई थोरात यांच्या नेतृत्वात २००० विद्यार्थी या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.

यशोधन जनसंपर्क कार्यालय येथून या सर्व विद्यार्थिनी पुणे कडे रवाना झाले. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज की जय,विद्यार्थी एकतेचा विजय असो, वंदे मातरम, भारत माता की जय, छात्रों की गुंज सरकार को सुननी पडेगी, जय हिंद जय महाराष्ट्र या घोषणांनी परिसर दुमदुमला.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते खासदार राहुल गांधी हे देशभरातील युवकांशी छात्रों की गुज या कार्यक्रमाच्या माध्यमातून संवाद साधत आहे. विद्यार्थ्यांचे विविध प्रश्न त्यांच्या अडचणी समजून घेत केंद्र सरकार आणि राज्य सरकार पुढे मांडत आहे. या कार्यक्रमाची सत्ताधाऱ्यांनी मोठी धास्ती घेतली आहे.

यामुळे पुण्यामध्ये काल या कार्यक्रमासाठी सहभागी होणाऱ्या विद्यार्थिनींवर लाठी चार्ज करण्यात आला. या घटनेचा संपूर्ण महाराष्ट्रातून निषेध झाला. काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी या घटनेचा तीव्र निषेध केला तर या विद्यार्थ्यांचा काय दोष म्हणून सरकारला सवाल विचारला याचबरोबर ससून हॉस्पिटलमध्ये जाऊन जखमी विद्यार्थ्यांची भेट घेतली. यावेळी समवेत माजी मंत्री विजय वडेट्टीवार, माजी मंत्री सतेज पाटील, माजी आमदार मोहन जोशी यांसह विविध काँग्रेस पक्षाचे नेते उपस्थित होते.

या विद्यार्थ्यांवरील झालेल्या लाठी हल्ल्याचा युवक काँग्रेस नेत्या डॉ.जयश्रीताई थोरात यांनीही तीव्र शब्दात निषेध केला. विद्यार्थ्यांचा आवाज सरकार दाबू शकत नाही. विद्यार्थ्यांचा आवाज सरकारला ऐकावा लागेल.जखमी विद्यार्थ्याला धीर देत त्याला ससून हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले.

राज्यभरातून पुणे येथील ए आय एस एस एम एस शैक्षणिक संस्थेच्या मैदानावर सायं पाच वाजता हा कार्यक्रम होणार असून संगमनेर मधून शहर व तालुक्यातील २००० विद्यार्थीनी या कार्यक्रमांमध्ये सहभागी होणार आहेत थेट राहुल गांधींशी संवाद साधण्याची संधी या विद्यार्थिनींना डॉ जयश्रीताई थोरात यांच्या माध्यमातून मिळणार आहे. विद्यार्थिनींचा उत्साह घोषणाबाजी यामुळे संगमनेर चा आवाज पुणे येथील कार्यक्रमात घुमणार आहे.



### ठेकेदाराच्या कामाची सखोल चौकशी करा विद्यार्थ्यांचे प्रश्न आहे का ? समजून घ्या, आवाज दडपवू नका : डॉ.जयश्रीताई थोरात

शिष्यवृत्ती चा प्रश्न मांडणाऱ्या पुणे येथील विद्यार्थ्यांवर पोलिसांनी लाठी हल्ला केला असून हा अत्यंत दुर्दैवी आहे. विद्यार्थ्यांचे प्रश्न आहे का ? समजून घ्या. त्यांचा आवाज दडपऊ नका. ही झेन झी आहे त्यांना समजावून घ्यावा लागेल. खासदार राहुल गांधी यांच्या छात्रो की गुंज कार्यक्रमाला देशभरातून मोठा प्रतिसाद मिळत असून त्यामुळे विरोधक या कार्यक्रमाबाबत संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. विद्यार्थ्यांमधील उत्साह आणि आत्मविश्वास यामुळे पुणे येथील हा कार्यक्रम अत्यंत यशस्वी होईल असा विश्वास व्यक्त करताना सरकारने विद्यार्थ्यांचे प्रश्न समजून घ्या असे आवाहन युवक काँग्रेसच्या नेत्या डॉ. जयश्रीताई थोरात यांनी केले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ-१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# थोडक्यात पण महत्त्वाचे

## येडगाव धरण १०० टक्के भरले

शिवनेरी(समर्थ गांवकरी)

येडगाव धरणातील दि. २१ रोजी पाणी पातळी ६४१आसुन पाणीसाठा टक्केवारी १०० % आहे .या धरणापासुन आळकुटी , पारनेर , वाडेगव्हाण , विसापूर धरण , श्रीगोंदा , आळसुंदे , मांगीगाव व करमाळा पर्यंत शेतकऱ्यांना पाणी वर्षभर मिळत आहे. धरणातील पाणीसाठा नियंत्रित करण्यासाठी आज दुपारी ४ : ३० वा . धरणात येणारा पाण्याचा प्रवाह व पाण्याच्या पातळीत सातत्याने वाढ सुरू आहे.

धरणातील सांडव्यावरून नदीपात्रात सुरु असलेल्या २०० क्युसेक्स विसर्गामध्ये १०० क्युसेक्स सुरु करुन एकूण ३०० क्युसेक्स करण्यात आलेला आहे. तसेच सिंचन विमोचकाद्वारे कालव्यामध्ये १४०० क्युसेक्स विसर्ग सुरू आहे.

पाणलोट क्षेत्रात होणा-या पावसाच्या प्रमाणानुसार धरणातून नदीपात्रात होणारा विसर्ग पुन्हा कमी/जास्त करण्यात येईल.

येडगाव धरण कुकडी नदी काठच्या सर्व नागरीकांना सूचित करण्यात येते की, कृपया नदीपात्रात कोणीही उतरू नये आणि नदी मधील पाण्याचे पंप, नदी काठचे शेती अवजारे व तत्सम साहित्य अथवा जनावरे असल्यास तात्काळ हलविणे गरजेचे आहे .

या भागातील संबंधित नागरिकांना सूचना देण्यात याव्यात, सर्वांनी योग्य ती खबरदारी व दक्षता घेत जलसंपदा विभागास/प्रशासनास सहकार्य करा असे आवाहन करण्यात आली आहे.

## संरक्षण उत्पादनात भारताची झेप

### स्वदेशी K-203 रायफलची यशस्वी निर्मिती

नवी दिल्ली (समर्थ गांवकरी)

स्वदेशी संरक्षण उत्पादनाच्या क्षेत्रात भारताने आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. 'मेक इन इंडिया' उपक्रमांतर्गत अमेठीतील कोरवा आयुध निर्मिती प्रकल्पात पहिली १०० टक्के स्वदेशी K-203 असॉल्ट रायफल यशस्वीपणे तयार करण्यात आली असून तिची प्राथमिक चाचणीही घेण्यात आली आहे. या रायफलला 'शेर' असे नाव देण्यात आले आहे.

K-203 रायफल्सच्या स्थानिक उत्पादनासाठी भारत आणि रशियाने २०१९ मध्ये स्थापन केलेल्या इंडो-रशियन रायफल्स प्रायव्हेट लिमिटेडने (IRRPL) ही कामगिरी केली आहे. IRRPLचे उएज आणि MD मेजर जनरल एस. के. शर्मा यांनी याबाबत माहिती दिली. त्यांच्या म्हणण्यानुसार, 'शेर' रायफलमधील प्रत्येक घटक आणि कच्चा माल भारतीय उद्योगातूनच मिळवण्यात आला आहे. त्यामुळे हे केवळ काही भागांचे स्थानिकीकरण नसून रायफलचे संपूर्ण स्वदेशीकरण असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

बर्स्ट फायरिंगसह चाचणी यशस्वी

पहिल्या १०० टक्के स्वदेशी K-203 'शेर'ची बर्स्ट फायरिंगसह चाचणी घेण्यात आली असून, प्राथमिक निकाल उत्साहवर्धक असल्याचे IRRPLने सांगितले आहे. सप्टेंबर २०२६ मध्ये भारतीय लष्कराच्या चाचण्यांसाठी १०० टक्के स्वदेशी प्रोटोटाइप तयार करण्याचे काम सुरू आहे.

## इस्त्रोची प्रक्षेपण वाहन निर्मितीतून माघार; खासगी कंपन्यांकडे जबाबदारी

नवी दिल्ली (समर्थ गांवकरी)

नवी दिल्ली : भारताच्या अंतराळ कार्यक्रमात मोठा बदल होण्याची शक्यता आहे. भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्त्रो) हळूहळू प्रक्षेपण वाहने (लाँच व्हेईकल) आणि सामान्य उपग्रहांच्या निर्मितीतून माघार घेऊन ही जबाबदारी खासगी कंपन्या आणि सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांकडे (पीएसयू) सोपवण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे.

भारतीय राष्ट्रीय अंतराळ प्रोत्साहन व प्राधिकरण केंद्राचे (खछ-झ्झउश) अध्यक्ष डॉ. पवन गोयनका यांनी 'बिझनेस टुडे'च्या खपवळर १०० एलेपॄ डींाळींम ध्ये याबाबत माहिती दिली. या बदलामुळे इसरोला संशोधन, अत्याधुनिक तंत्रज्ञान, वैज्ञानिक मोहिमा आणि खासगी कंपन्यांना स्वतः



च्या स्तरावर विकसित करणे शक्य नसलेल्या प्रगत पायाभूत सुविधांवर अधिक लक्ष केंद्रित करता येणार आहे. डॉ. गोयनका यांच्या म्हणण्यानुसार, इस्त्रोकडून प्रक्षेपण वाहनांची निर्मिती करण्याची जबाबदारी आता खासगी क्षेत्राकडे सोपवण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. या बदलाची सुरुवात स्मॉल सॅटेलाइट लॉन्च व्हेईकल (एसएसएलव्ही) पासून झाली आहे. निविदा प्रक्रियेनंतर एसएसएलव्हीचे तंत्रज्ञान आणि उत्पादनाचे अधिकार हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेडकडे (एचएएल) सोपवण्यात आले आहेत. यामुळे एसएसएलव्हीचे उत्पादन व्यावसायिक पद्धतीने खासगी क्षेत्राच्या सहभागातून केले जाणार आहे.

एसएसएलव्ही नंतर भारताचे महत्त्वाचे प्रक्षेपण वाहन पीएसएलव्ही आणि देशातील सर्वात शक्तिशाली कार्यरत रॉकेट एलव्हीएम३ यांची निर्मितीही खासगी क्षेत्राकडे सोपवण्याची तयारी सुरू आहे. या प्रक्रियेत सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांचा समावेश केला जाणार नसून, संबंधित प्रक्षेपण वाहनांच्या निर्मितीची जबाबदारी खासगी कंपन्यांकडे देण्यात येणार असल्याचे गोयनका यांनी स्पष्ट केले. या बदलानंतर इस्त्रोची भूमिका हळूहळू संशोधन आणि विकास (आर एन्ड डी) संस्थेच्या स्वरूपाची होणार आहे. वैज्ञानिक मोहिमा, नवीन आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान, विशेष प्रकारचे उपग्रह तसेच प्रगत पायाभूत सुविधा विकसित करण्यावर इस्त्रो अधिक भर देईल.तंत्रज्ञान विकसित झाल्यानंतर त्याचे व्यावसायिक उत्पादन आणि वापर खासगी कंपन्यांकडे हस्तांतरित केला जाऊ शकतो.

# ज्येष्ठ पत्रकार अनुपकुमार भार्गव यांना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने श्रद्धांजली!

नागपूर (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे नागपूर विदर्भ अध्यक्ष तथा दैनिक पुलगाव टाइम्सचे संपादक, ज्येष्ठ पत्रकार स्व. अनुपकुमार भार्गव यांचे नुकतेच नागपूर येथे उपचारादरम्यान हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या निधनाच्या अवघ्या आठ दिवसांपूर्वी त्यांच्या मातोश्री स्व. पार्वतीदेवी यांचेही निधन झाले. या दु:खद प्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने त्यांच्या कुटुंबीयांची सांत्वन भेट घेऊन स्व. अनुपकुमार भार्गव यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

यावेळी त्यांच्या कार्यकाळातील अनेक आठवणींना उजाळा देण्यात आला. विशेषतः 'दीक्षाभूमी ते मंत्रालय संवाद यात्रा' तसेच पत्रकारांच्या विविध प्रश्नांसाठी झालेल्या आंदोलनांमध्ये स्व. भार्गव यांनी वसंतराव मुंडे आणि महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या सोबत खांद्याला खांदा लावून सक्रिय सहभाग घेतला होता. पत्रकारांच्या न्याय्य हक्कांसाठी त्यांनी शेवटच्या श्वासापर्यंत लढा दिला. पत्रकार चळवळीशी त्यांनी केलेले समर्पण आणि त्यांची कार्यतत्परता पुढील पिढीतील पत्रकारांसाठी नेहमीच प्रेरणादायी राहील, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

दु:खाच्या या प्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने भार्गव कुटुंबीयांना रोख आर्थिक मदत व किराणा साहित्य देऊन दुखवटा व्यक्त करण्यात आला. यावेळी स्व. भार्गव यांचे ज्येष्ठ बंधू, नामांकित विधितज्ज्ञ तथा ज्येष्ठ पत्रकार ओमप्रकाश भार्गव, अशोककुमार भार्गव, अतुलकुमार भार्गव, अरविंद भार्गव, त्यांच्या पत्नी, भावजय व चार मुली उपस्थित होत्या. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य







सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, मराठवाडा संपर्कप्रमुख कुंडलिक वाळेकर आणि उत्तर महाराष्ट्र संपर्कप्रमुख विजय शेळके यांच्यासह पत्रकार संघाचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. यावेळी स्व. अनुपकुमार भार्गव यांच्या कार्याला अभिवादन करून त्यांच्या कुटुंबीयांना या कठीण प्रसंगी संघटना खंबीरपणे सोबत असल्याचा विश्वास देण्यात आला.

# कै. वसंतराव चव्हाण यांच्या स्मृतिनिमित्त नायगावात २६ ऑगस्ट रोजी भव्य कीर्तन सोहळा

### प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली पठाडे यांचे कीर्तन

नायगाव (समर्थ गांवकरी)





लोकनेते तथा माजी खासदार कै. वसंतराव बळवंतराव चव्हाण यांच्या द्वितीय पुण्यस्मरणानिमित्त नायगाव (बा.) येथे भक्ती, अध्यात्म आणि सामाजिक एकतेचा संदेश देणाऱ्या भव्य कीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवार, दि. २६ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९ वाजता समाधी पूजन त्या नंतर १० ते १२ या वेळेत वसंत स्मृती कृषी महाविद्यालयाच्या लालवंडी रोड नायगाव बा. परिसरात हा सोहळा होणार आहे.

महाराष्ट्रातील प्रसिद्ध कीर्तनकार युवाकीर्तीवीर ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली पठाडे यांचे हरिनामाचे कीर्तन यावेळी होणार असून, त्यांच्या ओघवत्या वाणीतून अध्यात्मासोबतच सामाजिक प्रबोधनाचा संदेश दिला जाणार आहे. कीर्तनाच्या माध्यमातून लोकनेते कै. वसंतराव चव्हाण यांच्या सेवाभावी कार्याला व जनसेवेला अभिवादन करण्यात येणार आहे.

कै. वसंतराव चव्हाण यांनी आयुष्यभर सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी संघर्ष केला. साधेपणा, माणुसकी, जनसामान्यांशी असलेली आपुलकी आणि सर्वांना सोबत घेऊन जाण्याची कार्यपद्धती यामुळे त्यांनी जनमानसात अढळ स्थान निर्माण केले. त्यांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने या कीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

पंचक्रोशीतील गायक, वादक, भजनी मंडळे तसेच जिल्हाभरातून येणाऱ्या भाविकांच्या उपस्थितीत हा सोहळा भक्तिमय वातावरणात पार पडणार आहे. कीर्तनानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन खा. रविंद्र वसंतराव चव्हाण,व चव्हाण परिवार तसेच समस्त गावकरी मंडळी, नायगाव (बा.) यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## भारतीय पोस्ट खात्याने रजिस्टर ई. डी. मधे अन्याय कारक दरवाढ केल्याने ग्राहकांमधे प्रचंड नाराजी

जामखेड (समर्थ गांवकरी)

पोष्ट खात्याने सुमारे एक वर्षांपूर्वी रजिस्टर च्या दरामधे टक्के वारीत वाढ न करता चक्क पटित दर वाढ केली आहे.. या प्रकारामुळे वकीलांना.. पत संस्थाना. बँकांना. त्याच बरोबर सामान्य नागरिकांना आर्थिक झळ सोसावी लागत आहे..

सन २०२४मधे रजिस्टर ई. डी. २५/रुपये मध्ये होत असे. सन २०२५ मधे पोस्ट खात्याने रजिस्टर चे दर चक्क ७४ / रुपये केले.पिन कोड बदलला की रजिस्टर चा रेट बदलत आहे. जवळपास तिप्पट दरवाढ झाली आहे.. इतकी दरवाढ ईतर कोणत्याच वस्तूची झाली नाही.. आणि होत नाही... मग पोष्ट खात्याने ऐवढी जबर दरवाढ कसी केली? हा यक्ष प्रश्न निर्माण झाला आहे.. या बाबत नागरिकांमधे तिव्र नाराजी आहे.. काही ग्राहक या बाबत ग्राहक मंचा कडे दाद मागण्याच्या मनस्थितीत आहेत.. याबाबत कोणी तरी आवाज उठवला पाहिजे. सदरची दरवाढ अन्याय कारक आहे. हे निश्चित..

२५/रुपये चे रजिस्टर चक्क ७४/रुपये करताना पोष्ट खात्याने ग्राहकांचा काहीच कसा विचार केला नाही.. करावासा वाटला नाही.

दरवाढ करताना ग्राहकांना गृहीत धरले गेले आहे. . हा ग्राहकांवर अन्याय आहे.. याला कोठेतरी. वाचा फोडली पाहिजे..भारत सरकारने पोस्ट खात्यास काही अधिकार दिले आहेत. त्या अंतर्गत ही दर वाढ केली आहे. या मुळे

पोष्ट ऑफीस मधे रजिस्टर करणयाची संख्या कमी झाली आहे. हा पोस्ट खात्याला आर्थिक फटकाच आहे. याही बाबीचा विचार पोस्ट खात्याने जरूर विचार केला पाहिजे.

## 'कर्जाचा हिशोब द्या!' शेतकऱ्याच्या चार दिवसांच्या उपोषणानंतर पतसंस्थेचे ऑडिटचे आश्वासन

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)





निघोज तालुका पारनेर येथील सचिन लाळगे या शेतकऱ्याचे श्रीसाई ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था, पारनेर यांच्याविरुद्ध गेल्या चार दिवसांपासून चालू केलेले उपोषण त्यांच्या कर्ज प्रकरणाचे चाचणी लेखापरीक्षण करून देण्याच्या आश्वासनानंतर शुक्रवारी दुपारी मागे घेण्यात आले.

याबाबत अधिक माहिती अशी की, निघोज येथील शेतकरी सचिन लाळगे यांनी भैरवनाथ पतसंस्थेकडून चार लाख रुपये कर्ज घेतले होते. पुढे ही पतसंस्था पारनेर येथील श्रीसाई ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेत विलीन झाल्यानंतर या पतसंस्थेने लाळगे यांच्याकडे सुमारे ६० लाख रुपये कर्ज रकमेची थकबाकी दाखवून वसुलीची कारवाई चालू केली होती. याप्रकरणी शेतकऱ्याची जमीन जप्त करून लिलावात काढली असताना लाळगे यांनी त्यास विरोध करत हरकत घेऊन त्यांच्या कर्ज प्रकरणाचे चाचणी लेखापरीक्षण झाल्याशिवाय वसुलीची कोणतीही कारवाई करू नये अशी भूमिका घेऊन पतसंस्थेच्या विरुद्ध सदर पतसंस्थेसमोर उपोषण चालु करण्याचा निर्णय घेतला होता. उपोषणकर्त्या शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार पतसंस्थेने अव्वाच्या - सव्वा बेकायदा व्याज लावून त्याच्या कर्जाचा फुगवटा निर्माण करून त्यांचेवर अन्याय केल्याचा आरोप करत त्यांनी उपोषणाला सुरुवात केली होती.

## मनोहरपुर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

### डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या सहकार्याबद्दल ग्रामस्थांकडून आभार!

अकोले (समर्थ गांवकरी)



अकोले तालुक्यातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे, या सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक तथा म हाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस सन्म ाननीय डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या सहकार्यातून शेरणखेल येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. स्वातंत्र्यदिनाच्या पवित्र पर्वावर दि. १५ ऑगस्ट रोजी विद्यार्थ्यांना वह्या, पेन तसेच खाऊ देण्यात आला.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला असून, त्यांना शिक्षणासाठी नव्या उमेदीने प्रयत्न करण्याची प्रेरणा मिळाली. ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन करण्यात आलेली ही मदत केवळ साहित्य वाटप नसून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी दिलेले प्रेरणादायी योगदान असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी सामाजिक बांधिलकी जपत केलेल्या या उपक्रमाबद्दल समस्त ग्रामस्थ म नोहरपुर, शालेय व्यवस्थापन समिती, मुख्याध्यापक संजयकुमार शिंदे व शिक्षकवृंद यांच्या वतीने सन्माननीय डॉ. विश्वासराव आरोटे यांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले.

# श्रद्धेला विकासाची जोड; मंदिर परिसर होणार सुशोभित

## आ. दाते यांच्या हस्ते पोखरी-पवळदऱ्यात विविध विकासकामांचा शुभारंभ

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

शनिवार दि. २२ ऑगस्ट २०२६ पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघातील पोखरी व पवळदरा परिसरातील विविध विकासकामांचा शुभारंभ पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार काशिनाथ दाते सर यांच्या शुभहस्ते नारळ वाढवून करण्यात आला. स्व. गं. भा. कोसाबाई व कै. तुळशीराम मामा शेलार यांच्या स्मरणार्थ मा. परशुराम शेलार मामा, माजी उपसरपंच यांनी स्वखर्चातून ५ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून पोखरी येथील विकासकामांना हातभार लावला आहे. त्यांच्या या सामाजिक बांधिलकीचे यावेळी विशेष कौतुक करण्यात आले.

या निधीतून पवळदरा (पळसवाडी) येथील बंदिस्त गणपती मंदिराकडे जाणारा रस्ता करणे तसेच येडूबाई माता मंदिराचे सुशोभीकरण करणे या कामांना प्रारंभ करण्यात आला. स्थानिक पातळीवर स्वखर्चातून निधी उपलब्ध करून विकासकामांना हातभार लावण्याची ही भूमिका निश्चितच परिसराच्या विकासाला बळ देणारी ठरत असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

यावेळी बोलताना आमदार काशिनाथ दाते सरांनी पोखरी-पवळदरा परिसरातील नागरिकांच्या विविध म ागण्या आणि विकासाच्या प्रश्नांची दखल घेत, ही कामे येत्या काळात पूर्णत्वास नेण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे सांगितले. जनतेच्या गरजा आणि स्थानिक विकासकामांना प्राधान्य देत उपलब्ध निधीच्या माध्यम ातून अधिकाधिक प्रश्न मार्गी लावण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही त्यांनी दिली. यावेळी ग्रामपंचायत सदस्य राहुल मधे तसेच साहेबराव खंडागळे यांनी परिसरातील विविध मागण्या आमदार दाते सर यांच्यासमोर मांडल्या.

कार्यक्रमास माजी उपसरपंच परशुराम मामा शेलार, सामाजिक न्याय अध्यक्ष अशोक खैरे, मा. चेअरमन यादव फरतारे, कुंडलिक वाकळे, अण्णा पवार, बाबुराव आहेर, सोपान फरतरे, महादु पवार, बन्सी करंजेकर, गोविंद पवार, म्हताजी करंजेकर, निलेश पवार, बाळशीराम शिंदे, युवा सहकारी शिवम पवार, डॉ. अविनाश शेलार, चंद्रकांत राजभोज, विनायक





शिंदे, विठ्ठल फरतरे, साहेबराव फरतरे, योगेश फरतारे, गणेश फरतरे, राहुल मधे, आनंदा केदार, सत्यवान करंजेकर, सिताराम केदार, विष्णू खैरे, पंडित खैरे, बाबाजी खैरे, युवा नेते सचिन बबन पवार, दत्ता बर्डे, कैलास वाघ, मन्सूर पटेल, अशोक फरतारे, सारंगधर फरतारे, ज्ञानदेव पवार, मा. रंगनाथ पवार, भाऊसाहेब फारतारे, अण्णा दरेकर, गणपत शिंदे, रोहिदास दरेकर, गोवर्धन गायकवाड, गणपत रामू पवार, गणेश पवार, गोपीनाथ खैरे, मच्छिंद्र फरतरे, गोरख फरतारे, संपत आहेर, गणपत मधे, विलास गावडे, तुकाराम मधे, भाऊसाहेब मधे, लक्ष्मण मधे, अर्जुन मधे, पोपट मधे, संजय मधे, शरद भुतांबरे, झुंबर मधे, उंबर पटेल, पोपट कसबे, पोपट वाघ, बबन ढेरे, सूर्यभान खैरे, शिवाजी बर्डे, सर्जेराव शिंदे, गुलाब बर्डे, राजेंद्र भारथारे, कुंडलिक पवार, सुखा पवार, बाळू कांबळे आदी मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते.

दरम्यान, संजय गांधी निराधार योजनेच्या सदस्यपदी निवड झाल्याबद्दल अशोक खैरे यांचा आमदार काशिनाथ दाते सर व परशुराम मामा शेलार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोपान शेलार सर यांनी केले, तर आभार डॉ. अविनाश शेलार यांनी मानले.